# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**सिडकोच्या साडेबारा टक्के योजनेबाबत**

**(१) ६९७७७ (१६-०१-२०१७). श्री.अनिल (अण्णा) गोटे (धुळे शहर), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिडकोच्या साडेबारा टक्के योजनेतील ठाणे-बेलापूर पट्ट्यातील भूखंडासाठीच्या ५०० हून अधिक प्रकरणे गत वर्षापासून प्रलंबित असून त्यापैकी ५० नस्त्या गहाळ झाल्याचेही माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे-बेलापूर पट्ट्यातील साडेबारा टक्के योजनेतील ५०० हून अधिक प्रकरणे प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे तसेच प्रलंबित असलेली प्रकरणे निकालात काढण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०८-२०१८) :** (१) अंशतः खरे आहे.

ठाणे-बेलापूर पट्ट्यातील भूखंडासाठीच्या सिडकोच्या साडेबारा टक्के योजनेतील प्रलंबित प्रकरणांची संख्या सुमारे ५२३ असून गहाळ झालेल्या नस्त्यांची संख्या १२ आहे.

(२), (३) व (४) सिडकोमार्फत सन २०१३-१४ या कालावधीत ठाणे तालुक्यातील संचिकांबाबत पडताळणी करण्याकरिता ‘ संचिका निर्गती अभियान ’ ही योजना राबविण्यात आली. सदर कालावधीत ठाणे तालुक्यातील भूखंड वाटप प्रक्रिया बंद ठेवण्यात आलेली होती. सदर अभियानांतर्गत संचिकांमधील कागदपत्रांचे अवलोकन करून प्रवर्ग- अ, ब, क व ड नुसार वर्गीकरण करण्यात येऊन उक्त कालावधीत ३९९ भूखंडनिहाय संचिका तपासण्यात आल्या. त्यामध्ये १५२ इरादित भूखंड व २४७ इरादित नसलेले भूखंड समाविष्ट होते. सदर भूखंडांची विगतवारी खालीलप्रमाणे :-

**अ) १५२ इरादित भूखंड :-**

१) ३७ प्रकरणांमध्ये भूखंड वाटप

२) ३९ प्रकरणांमध्ये भूखंड वाटप रद्द

३) २६ प्रकरणे भूखंड वाटापासाठी प्रस्तावित

४) १२ प्रकरणांमध्ये अहवाल अप्राप्त

५) ९ प्रकरणे संभाव्य सोडतीत समाविष्ट करुन इरादित करण्यात आले.

६) २९  प्रकरणांमध्ये भूधारकांनी संपर्क न साधल्यामुळे भूखंड रद्द साठी प्रस्तावित.

**ब) २४७ इरादित नसलेले भूखंड :-**

१) ३ प्रकरणांमध्ये भूखंड वाटप

२) ४२ प्रकरणे भूखंड वाटापासाठी प्रस्तावित

३) २०२ संचिका पडताळणी करून अंतिम निर्णयासाठी प्रस्तावित.

याव्यतिरिक्त भूधारकांचे नवीन अर्ज प्राप्त झाल्यामुळे १५२ प्रकरणे सिडकोमार्फत प्रस्तावित करण्यात आलेली आहेत. गहाळ झालेल्या संचिकांची दुय्यम नस्त्या तयार करुन भूधारकांना भूखंड वाटप करण्याची कार्यवाही सिडकोमार्फत करण्यात येत आहे.

न्यायालयीन विवाद, वारस दाखला, दिवाणी चौकशी अर्ज, भूधारकांची पात्रतेपेक्षा अनधिकृत बांधकामे जास्त असल्यामुळे व कागदपत्रांची परिपूर्तता न केल्यामुळे अशा विविध कारणांमुळे ठाणे तालुक्यातील नवी मुंबई प्रकल्पग्रस्तांचे साडेबारा टक्के योजनेंतर्गतची काही प्रकरणे प्रलंबित आहेत. तसेच नस्त्या गहाळ झाल्याप्रकरणी संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्याची कार्यवाही सिडकोमार्फत सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**येवला (जि.नाशिक) मुक्तिभूमीला 'ब' वर्ग तीर्थक्षेत्र - पर्यटनस्थळाचा दर्जा देण्याबाबत**

**(२) ७८९९० (१५-०४-२०१७). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला (जि.नाशिक) मुक्तिभूमीला 'ब' वर्ग तीर्थक्षेत्र-पर्यटनस्थळाचा दर्जा देण्याबाबत जिल्हाधिकारी, नाशिक यांनी ग्रामविकास विभागास पाठविलेला प्रस्ताव ग्रामविकास विभागाकडून माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरमान पर्यटन विभागास प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येवला मुक्तिभूमिवर येणाऱ्या पर्यटकांना व भाविकांना जास्तीत जास्त सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी या स्थळाचा 'ब' वर्ग तीर्थस्थळ आणि पर्यटनस्थळामध्ये समावेश करण्याबाबत शासनाने कोणती कायवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०६-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) जिल्हाधिकारी, नाशिक यांच्याकडून “ब” वर्ग तीर्थक्षेत्र दर्जा देण्याबाबतचा परिपूर्ण प्रस्ताव मागविण्यात आला आहे. याबाबत शासन स्तरावरुन देखील पाठपुरावा करण्यात येत आहे. प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर उचित कार्यवाही करण्यात येईल.
• येवला येथील मुक्तीभूमीला तीर्थक्षेत्राचा किंवा पर्यटन स्थळाचा दर्जा दिलेला नसल्यामुळे “ब” वर्ग पर्यटन स्थळे घोषित करण्यासंबंधीच्या निकषांची पूर्तता होत नसल्यामुळे येवला मुक्तीभूमीला “ब” वर्ग पर्यटन स्थळाचा दर्जा देण्याबाबतचा प्रस्ताव पर्यटन विभागाकडून अमान्य करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील एमएमआरडीएने प्रादेशिक विकास आराखडा तयार केल्याबाबत**

**(३) ८५२६५ (२३-०८-२०१७). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील एमएमआरडीए अधिका-यांनी महानगरपालिकेला न विचारता नागरिकांची मते विचारात न घेता प्रादेशिक विकास आराखडा तयार केल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या विकास आराखडयात ग्रीन झोन १ व २ मध्ये अतिधोकादायक प्रकल्पांना मान्यता देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या विकास आरखडया विरोधात सुमारे ८० हजार तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने या प्रकरणी चौकशी करुन संबंधित अधिका-यांवर कारवाई करुन सदरील विकास आराखडा रदद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०८-२०१८) :** (१) हे खरे नाही. महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या तरतुदी अंतर्गत प्राधिकरणाने मुंबई महानगर प्रदेशासाठी प्रारुप प्रादेशिक योजना, २०१६-३६ तयार केली असून, मुंबई महानगर नियोजन समितीने त्यास मान्यता दिली आहे. सदर योजना मुंबई महानगर प्रदेशातील सर्व महानगरपालिका / नगरपालिका तसेच संबंधित शासनाचे विभाग, इतर पायाभूत सुविधा पुरविणा-या संस्था, नियोजन प्राधिकरणे, शासकीय व अशासकीय संस्था, इत्यादी यांच्या सोबत बैठक घेऊन सल्लामसलत करुन तयार करण्यात आली आहे. तसेच दिनांक १९/९/२०१६ च्या सुचनेन्वये सदर प्रादेशिक योजना प्रसिध्द करुन, जनतेकडून सूचना/हरकती मागविण्यात आल्या होत्या. सदर सुचना/ हरकती बाबत नियोजन समितीमार्फत सुनावणी घेण्यात आली आहे.
(२) प्रादेशिक योजनेच्या प्रारुप विकास नियंत्रण नियमावली, २०१६-३६ नुसार हरीत-१ भूवापर विभागामधील १० हेक्टर पेक्षा जास्त क्षेत्रफळाच्या जमिनीचा वापर हा सर्व प्रकारचे उदयोग

जेथे प्रस्तावित पायाभूत सुविधा, औदयोगिक सांडपणी प्रक्रिया आणि आपत्कालिन व्यवस्था इत्यादी महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळाच्या औदयोगिक क्षेत्राप्रमाणे असल्याबाबत महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळाची सहमती असेल तेथे अनुज्ञेय आहे. परंतू हरीत-२ भूवापर विभागातील जमिनीचा वापर फक्त शेती आधारीत उदयोगांसाठी अनुज्ञेय आहे.
(३) सदर प्रसिध्द प्रारुप प्रादेशिक योजनेवर एकूण सुमारे ६३,३०० इतक्या सुचना/हरकती प्राप्त झाल्या आहेत.
(४) मुंबई महानगर प्रदेशातील सर्व महानगरपालिका/ नगरपरिषदा तसेच संबंधित शासनाचे विभाग व इतर संबंधित संस्थाशी सल्ला -मसलत करुनच प्रारुप प्रादेशिक योजना तयार करण्यात आली असून सदर प्रादेशिक योजनेची कार्यवाही महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ मधील तरतुदींच्या आधिन राहूनच केली जात असल्यामुळे सदर प्रकरणी संबंधित अधिका-यांवर कार्यवाही किंवा प्रादेशिक योजना रदद करयाचा प्रश्न उदभवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नवी मुंबईतील जमिनीची मूळ मालकी अद्‌यापी सिडकोकडेच असल्याने या जमिनी फ्री होल्ड करण्याचा प्रस्ताव

**(४) ८६४९६ (२३-०८-२०१७). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबईतील सिडकोने सन १९७० साली संपादित केलेल्या जमिनीची मूळ मालकी अद्‌यापी सिडकोकडेच असल्याने या जमिनी फ्री होल्ड करण्याचा प्रस्ताव सिडकोकडून शासनाकडे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रस्तावावर शासनाने निर्णय घेतला आहे काय व त्याचे स्वरुप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०८-२०१८) :** (१) व (२) होय. नवी मुंबई जमीन विनियोग विनियम (सुधारित),२००८ नुसार भाडेपट्ट्याने देण्यात आलेल्या मालमत्तांच्या हस्तांतरण व वापर बदलाबाबत निश्चित करण्यात आलेल्या काही अटी व शर्ती शिथील करुन भाडेपट्टा करारनाम्याच्या कालावधीत सुधारणा करण्याबाबतचा संचालक मंडळाने पारित केलेला दि.११.०८.२०१७ चा ठराव क्रमांक ११९१२ शासन मान्यतेसाठी दि.२८.०९.२०१७ रोजी सादर केला आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि.१३.०३.२०१८ रोजी झालेल्या बैठकीतील निदेशास अनुसरुन प्रस्तुत प्रस्तावाच्या आर्थिक व्यवहार्यतेचा तपशील दि.२४.०४.२०१८ रोजीच्या पत्रानुसार सिडको महामंडळाकडून प्राप्त झाला आहे. सिडको महामंडळाने सादर केलेल्या प्रस्तावाची सविस्तर तपासणी करुन उचित निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शहापूर तालुक्याचा (जि.ठाणे) एमएमआरडीएमध्ये समाविष्ट करण्याबाबत**

**(५) ८७७२५ (२३-०८-२०१७). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर तालुक्याचा (जि.ठाणे) विकास होण्याकरिता सदर तालुका एमएमआरडीएमध्ये समाविष्ट करण्याची मागणी मा.मुख्यमंत्री यांचेकडे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २० मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०८-२०१८) :** (१) होय

(२) यासंदर्भात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने त्यांची भूमिका शासनापुढे मांडलेली आहे. ठाणे-पालघर-रायगड प्रदेशाची प्रादेशिक योजना शासनाने दिनांक ६/१/२०१८ च्या अधिसुचनेन्वये मंजूरी केली असून, सदर प्रादेशिक योजनेमध्ये शहापूर तालुक्याचा समावेश आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उल्हासनगर महानगरपालिकेने (जि.ठाणे) बोअरवेलच्या विद्युत बिलाची रक्कम महावितरण कंपनीकडे भरली नसल्याबाबत**

**(६) ८८७८८ (२३-०८-२०१७). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर महानगरपालिकेने (जि.ठाणे) शहरात पाणी टंचाईवर मात करण्यासाठी ठिकठिकाणी बोअरवेलची व्यवस्था केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत ८ महिन्यांपासून सदर बोअरवेलच्या विद्युत बिलाची रक्कम महावितरण कंपनीकडे न भरल्याने महावितरण कंपनीने बोअरवेलला दिलेला विजपुरवठा खंडीत करून विद्युत मिटर काढून नेले त्यामुळे ऐन पाणी टंचाईच्या काळात नागरिकांना बोअरवेलचे पाणी मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महानगरपालिका प्रशासनाने विद्युत पुरवठा पुर्ववत करणेसाठी शासनाच्या उर्जा विभागाकडे मागणी केली आहे काय,

(४) असल्यास, उक्त बाबातीत शासनस्तरावरून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२), (३), (४) व (५) उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील अस्तित्वात असलेल्या विंधन विहिरींवर मोटार पंप बसविण्यात आले असून, विद्युत वापरानुसार विद्युत महामंडळाकडून प्राप्त होणारी देयके महानगरपालिकेमार्फत भरली जात होती.

परंतु, माहे जानेवारी २०१७ मध्ये विद्युत महामंडळाकडून मोटार पंपाची ६ ते ७ महिन्यांच्या कालावधीची विद्युत देयके एकत्रित दिल्याने महानगरपालिकेमार्फत सदर देयके विहित मुदतीत अदा करता आली नाहीत ही वस्तुस्थिती आहे. तसेच, आकारणी करण्यात आलेली देयके सरासरीप्रमाणे असल्याने, सदर देयके रिडींगनुसार देण्याबाबत विद्युत महामंडळास विनंती करण्यात आली होती.

तथापि, विद्युत महामंडळाकडून विद्युत देयके न भरलेल्या काही मोटार पंपांची वीज जोडणी मार्च अखेर व एप्रिलच्या पहिल्या आठवड्यामध्ये खंडीत करण्यात आली होती.

उल्हासनगर शहरात पाणी टंचाई असल्याने पाणी पुरवठयाची पर्यायी व्यवस्था सुरु ठेवणे आवश्यक होते. त्यामुळे महानगरपालिका क्षेत्रातील कॅम्प नंबर १ ते ३ परिसरातील विद्युत मोटार पंपांची वीज वापर देयके अदा करण्यासाठी महानगरपालिकेमार्फत विद्युत महामंडळास दिनांक ०६.०५.२०१७ रोजी रु. ५ लक्ष इतक्या आगाऊ रकमेचा भरणा करुन खंडीत करण्यात आलेल्या एकूण १७ विंधन विहिरींचा विद्युत पुरवठा सुरु करण्यात येऊन पाणी पुरवठा सुर करण्यात आला.

सद्य:स्थितीत विद्युत महामंडळाकडून प्राप्त विद्युत देयके महानगरपालिकेमार्फत वेळेवर भरण्यात येत असल्यामुळे कोणत्याही विंधन विहिरींचा विद्युत पुरवठा खंडीत करण्यात आलेला नाही.

---

## ठाणे जिल्ह्यातील धोकादायक इमारतीच्या पुनर्बांधणीकरिता समुहविकास योजना राबविण्याबाबत

**(७) ८९९९८ (२३-०८-२०१७). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्ह्यातील धोकादायक इमारतीच्या पुनर्बांधणीकरिता समुह विकास योजना राबविण्याचा मार्ग मोकळा असल्याचे मा.उच्च न्यायालयाने दिनांक १४ जून, २०१७ रोजी वा सुमारास स्पष्ट करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ठाणे जिल्ह्यातील कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने समूहविकास योजनेत सहभागी होण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील धोकादायक इमारतीच्या समूह विकास योजनेत समावेश करण्याबाबत कोणता निर्णय घेतला आहे व त्याचा फायदा किती धोकादायक इमारतींना होणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०८-२०१८) :** (१) ठाणे शहराच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये नागरी पुनर्निर्माण विकास योजनेची नियमावली समाविष्ट करण्याअनुषंगाने सदरची नियमावली महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७(१कक) मधील तरतुदीनुसार आम जनतेकडून हरकती/सूचना मागविण्याकरिता दि.४/३/२०१४ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. जनहित याचिका क्र.६१/२०१४ मध्ये मा. उच्च न्यायालयाने सदर नियमावली बाबत अंतिम निर्णय घेण्यापूर्वी आघात मुल्यांकन अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार ठाणे महानगरपालिकेने आघात मुल्यांकन अहवाल तयार केला व तो शासनाने मा.उच्च न्यायालयास सादर केला. मा.उच्च न्यायालयाच्या दि.९/६/२०१७ रोजीच्या निर्णयानंतर ठाणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये नागरी पुनर्निर्माण योजनेच्या नियमावलीची कलम ३७(१कक)(ग) ची अधिसूचना दि.५/७/२०१७ रोजी निर्गमित करण्यात आली आहे.

(२) व (३) कल्याण-डौंबिवली महानगरपालिकेने असा प्रस्ताव शासनास मंजुरीकरीता सादर केलेला नाही. तथापि, शासनाने मुंबई महानगर प्रदेशातील (बृहन्मुंबई, नवी मुंबई व पनवेल महानगरपालिका क्षेत्रामधील सिडकोचे क्षेत्र वगळून उर्वरित) महानगरपालिका क्षेत्रासाठी एकात्मिक विकास नियंत्रण नियमावली लागु करण्याचा तत्वत: निर्णय घेऊन प्रारुप नियमावली दि.२८/२/२०१७ रोजी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१कक)(क) अन्वये आम जनतेकडून हरकती/सुचना मागविण्यासाठी प्रसिध्द केली आहे. सदर प्रारुप नियमावलीमध्ये रेग्युलेशन फॉर अर्बन रिन्युअल स्कीमची तरतुद प्रस्तावित करण्यात आली आहे. तत्पुर्वी महानगरपालिका क्षेत्रामध्ये क्लस्टर डेव्हलपमेंट योजना लागू करण्यासाठीचा प्रस्ताव महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेपुढे सादर करण्यात आला असता, सर्वसाधारण सभेने ठराव क्र.४४, दि.१८/७/२०१६ नुसार प्रस्तावामध्ये सुचना, सुधारणा व बदल सुचविण्याकरिता उपसमिती स्थापन केली असून, सदर समितीच्या शिफारशी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने शासनाने निर्गमित केलेल्या दि.२८/२/२०१७ च्या सुचनेच्या अनुषंगाने हरकत/सुचना म्हणुन नियुक्त अधिकारी तथा सहसंचालक, नगर रचना, कोकण विभाग, नवी मुंबई यांचेकडे पाठविल्या आहेत. सदरची नियमावली मंजूर झाल्यानंतर ती कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्राकरिता सुध्दा लागू होईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अंबरनाथ तालुक्यासाठी (जि.ठाणे) एमएमआरडीएने विकास आराखडा तयार करतांना २९ गावांमध्ये इन्स्टिट्युशनल झोन तयार करण्याचा घेतलेला निर्णय

**(८) ९२३८५ (२३-०८-२०१७). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ तालुक्यासाठी (जि.ठाणे) एमएमआरडीएने विकास आराखडा तयार करतांना त्यामध्ये वांगणी, चामटोली, बेंडशील, दहिवली, वाभाडे, भोज, कासेगांव, गोरेगांवसह २९ गावांमध्ये इन्स्टिट्युशनल झोन तयार करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याचे स्वरुप काय आहे व झोन मधील अटींमुळे २० गुंठ्यापेक्षा कमी जागांवर कोणताही प्रकल्प उभारता येत नसल्यामुळे या जमीनी पडून राहणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अंबरनाथ तालुक्यात अल्प भुधारक शेतकऱ्यांची संख्या जास्त असल्याने एमएमआरडीएने संपादित केलेल्या २० गुंठे जमीनीवर शेतकऱ्यांना काहीच करता येणार नसल्याने शेतकऱ्यांनी या निर्णयाला विरोध केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत एमएमआरडीएची निश्चित भूमिका काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०७-२०१८) :** (१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मुंबई महानगर प्रदेशासाठी प्रसिध्द केलेल्या प्रारुप प्रादेशिक योजनेमध्ये संस्थात्मक वापर विभाग (इन्स्टिट्युशनल झोन) प्रस्तावित केलेला आहे.
(२) मुंबई महानगर प्रदेशासाठीच्या प्रारुप विकास नियंत्रण नियमावलीतील विनियम क्र.२.२.३ मध्ये संस्थात्मक विभागातील अनुज्ञेय वापरांची यादी दिली असून, त्यातील एका कुटुंबाचे घर बांधण्यासाठी किमान २००० चौ.मी. जागा आवश्यक असण्याची अट आहे. तथापि, गावठाणापासून २०० मी. परिघातील जमिनीवंरील रहिवास व इतर वापरासाठी सदर अट लागू नाही.
(३) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने प्रसिध्द केलेल्या प्रारुप प्रादेशिक योजनेवर आम जनतेकडून एकूण सुमारे ६३,००० इतक्या हरकती/ सुचना प्राप्त झाल्या आहेत. त्यापैकी अंबरनाथ तालुक्यातून सुमारे १७० हरकती/सुचना प्राप्त झाल्या असून काही हरकती/सुचनांमध्ये प्रस्तावित संस्थात्मक (इन्स्टीटयूशनल) वापर विभागास हरकत नोंदविलेली आहे.
(४) सदर प्राप्त सुचना /हरकतीबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या तरतुदीनुसार नियोजन उप-समितीमार्फत सुनावणी घेण्यात आली असून, नियोजन उप-समितीने विचार विमर्श करुन आपला अहवाल महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना सादर केला आहे. प्राधिकरणाने सुधारीत प्रारुप प्रादेशिक योजना मुंबई महानगर नियोजन समितीस सादर केली असून, मुंबई महानगर नियोजन समितीने सदरची प्रारुप प्रादेशिक योजना शासनास दिनांक २३/२/२०१८ रोजी मंजूरीकरीता सादर केली आहे.

---

**सुतार चाळ, आझादनगर व कोथरूड (ता.हवेली, जि.पुणे)येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेबाबत**

**(९) ९४९३८ (२१-०९-२०१७). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोथरूड (ता.हवेली, जि.पुणे) येथील सर्व्हे नं.८७/७, अ" सुतार चाळ, आझादनगर, मधील रहिवासी शासन स्तरावर मंजुरी असतांनाही अनेक वर्षापासून झोपडपट्टी पुनर्वसनाच्या प्रतिक्षेत असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ठिकाणी झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत रहिवाश्यांचे फोटोपासही काढून झाले आहेत हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ठिकाणी झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प राबविण्यास होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, पुणे शहरात सध्यस्थितीत एकूण किती झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प प्रगतीपथावर आहेत व किती प्रकल्प अपात्र ठरविले आहेत व या प्रकरणी शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (१४-०८-२०१८) :** (१) व (२) होय, सदर क्षेत्रावरील झोपडपट्टी पुनर्वसन योजना प्राधिकरणाकडे दाखल आहे. सदर योजनेची पात्रता यादी पुणे महानगरपालिका यांच्याकडून २००९ मध्ये प्रसिध्द करण्यात आली आहे. त्यानुसार ४० पात्र झोपडीधारक असून सर्व झोपडीधारक पात्र आहेत.
(३) सदर योजना क्षेत्राची मिळकत मुळ मालकांनी पुणे महानगरपालिकेस दवाखाना बांधण्यासाठी बक्षीस दिली आहे. तथापि, जमिनीच्या अधिकार अभिलेखात पुणे महानगरपालिकेच्या नावाचा उल्लेख नाही. पुणे महानगरपालिकेने या प्रस्तावास हरकत घेतली असून त्यांनी उक्त मिळकतीचे मिळकत पत्रिकेवर पुणे महानगरपालिकेने नाव दाखल करण्याची कार्यवाही सुरू असल्याचे कळविले आहे. यास्तव उक्त प्रस्ताव सद्यस्थितीत प्रलंबित आहे. असा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा अहवाल आहे.
(४) सद्यस्थितीत पुणे शहरातील एकूण २४६ प्रस्ताव दाखल असून त्यापैकी ४६ प्रस्तावास मान्यता दिली असून त्यांचे काम चालू आहे. आजपर्यंत प्राधिकरणामार्फत एकूण ४७ प्रस्ताव पुर्ण झालेले असून एकूण ३६ प्रस्ताव दप्तरी दाखल करण्यात आले आहे. उर्वरित ११७ प्रस्ताव विविध टप्प्यांवर कामकाज सुरू झाले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कन्हान-पिपरी नगरपरिषद (जि.नागपूर) येथील कन्हान नदीतील पाण्यात जैविक वाढ होत असल्याबाबत

**(१०) ९८४१० (३०-१२-२०१७). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कन्हान-पिपरी नगर परिषद (जि.नागपूर) येथील कन्हान नदीतील पाण्यात जैविक वाढ होत असल्यामुळे नळाला येणारे पाणी हे गढूळ असून ते पिण्यायोग्य नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पाऊस न पडल्याने पाण्याची गुणवत्ता बदलली असून हिरवट रंग आला असल्याचे 'निरी' च्या जलतज्ञांचे मत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जलशुध्दीकरणाची योजना मंजूर झाली आहे काय, ती केव्हापर्यंत पूर्ण होईल,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.

सदर पाण्याची प्रयोगशाळेत चाचणी करुन ते पिण्यायोग आहे, याची खातरजमा करण्यात येते.

(२) हे खरे नाही,

(३) व (४) कन्हान पिंपरी नगरपरिषदेसाठी येथे जलशुध्दीकरण योजना मंजूर करण्यात आली असून रु.१८.९८ कोटीच्या योजनेस प्रशासकीय मान्यता दि.१२.०१.२०१८ रोजी देण्यात आली आहे. निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे.

---

**उल्हासनगर (जि.ठाणे) महानगरपालिकेतील बांधकाम परवानग्यांमधील अनियमितता**

**(११) ९८६२४ (३०-१२-२०१७). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) महानगरपालिकेतील नगररचनाकार श्री.संजीव करपे यांनी माहे जुलै-आगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यानच्या कालावधीमध्ये दिलेल्या सर्व बांधकाम परवानग्यांना महासभेत महापौरांनी दिलेल्या स्थगीतीबाबत व झालेल्या अनियमितते प्रकरणी उल्हासनगर महानगरपालिका मार्फत चौकशीची कार्यवाही सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी उल्हासनगर महानगरपालिकेने चौकशी करून दिलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास सादर केला आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी(वि.स.स) यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे सविस्तर तक्रारी दाखल केल्या असता उल्हासनगर महानगरपालिका प्रशासनास स्वयंस्पष्ट अभिप्राय शासनास सादर करण्याचे आदेश दिनांक ०२ सप्टेंबर, २०१६ च्या पत्राने नगरविकास विभागाकडून पाठविण्यात आले होते , ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त स्वयंस्पष्ट अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, त्यानूसार नगररचनाकार व स्थगिती दिल्यानंतरही बांधकामे सुरु ठेवणारे विकासक यांच्यावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात आली आहे,

(५) नसल्यास, विलंबाचे कारण काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०८-२०१८) :** (१) होय.

(२) नाही.

(३) होय.

(४) शासनास अदयाप अहवाल प्राप्त झालेला नाही. सदरचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर उचित निर्णय घेण्याची शासनाची भूमिका आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगोली शहरात म्हाडाअंतर्गत लाभार्थ्यांनी लॉटरीनुसार रक्कम भरुनही सदनिकेचा ताबा देण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली नसल्याबाबत**

**(१२) ९९८५५ (३०-१२-२०१७). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली शहरात म्हाडाअंतर्गत ११२ सदनिकांकरिता लाभार्थ्यांनी लॉटरीनुसार रक्कम भरुनही या सदनिकांची बांधकामे पूर्ण करुन ताबा देण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या सदनिकांच्या वाटपाबाबत मा.लोकप्रतिनिधींनी मा.गृहनिर्माण मंत्री यांना दिनांक ३१ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्या सुमारास लेखी पत्र दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या पत्राची दखल घेऊन शासनाने सदर सदनिकांची कामे वेळेत पूर्ण करुन लाभार्थ्यांना वाटप करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०३-०७-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.

सन्माननीय लोकप्रतिनिधींनी मा.गृहनिर्माण मंत्री यांना दि.३१.०८.२०१७ रोजी व त्या सुमारास लेखी पत्र दिल्याचे आढळून आले नाही.

(३) व (४) सदरहू योजनेतील अर्जदारांना दि.०२.०१.२०१८ च्या पत्रान्वये देकारपत्र देण्यात आले आहे. देकार पत्रानुसार संपूर्ण रकमेचा भरणा करणाऱ्या अर्जदारांना गाळा वाटप व ताबा देण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

---

**वांद्रे (मुंबई) येथील मरोळ-रुपारेल जलबोगद्याच्या कामामुळे झालेल्या दुर्घटनेबाबत**

**(१३) १००३८४ (०३-०१-२०१८). श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांद्रे (मुंबई) येथील मरोळ-रुपारेल जलबोगद्याच्या कामामुळे इंदिरानगर येथील ७२ इंची जलवाहिनी फुटल्याने रस्त्या शेजारील झोपडपट्टीतील ९ वर्षाची मुलगी व आठ महिन्यांचा मुलगा वाहून गेल्याचे दिनांक ०७ जुलै, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने संकटग्रस्त महिला श्रीमती पुनम डोहीफोडे यांना आर्थिक मदत जाहिर केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अद्यापपर्यंत सदर महिलेला जाहिर केलेली आर्थिक मदत मिळाली नसून त्यानुषंगाने निर्णयात्मक कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) सदर झोपडी ही अनधिकृत असल्याने, अनधिकृत बांधकामाबाबत झालेल्या दुर्घटनेबाबत वित्त वा जीवित हानी झाल्यास नुकसान भरपाई देण्याची तरतूद नसल्याने, सदर प्रकरणी महानगरपालिकेमार्फत आर्थिक मदत देण्यात आलेली नाही.

---

**मौजा वानाडोंगरी (जि.नागपूर) येथील हिंगण रोड येथील पॉयोनिअर ग्रुप या विकासकामार्फत उभारण्यात आलेल्या वसाहतीबाबत**

**(१४) १०१०९६ (०३-०१-२०१८). श्री.समिर मेघे (हिंगणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजा वानाडोंगरी (जि.नागपूर) येथील हिंगण रोड वरील पॉयोनिअर वुड्स फेज १ व २ या पॉयोनिअर ग्रुप या विकासकामार्फत उभारण्यात आलेल्या वसाहतीत अनेक उणिवा असल्याने रहीवाशांना होणारा त्रास दुर करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १४ जुलै, २०१७ रोजी वा त्या सुमारास जिल्हाधिकारी, नागपूर यांना निवेदन दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मौजा वानाडोंगरी येथील पॉयोनिअर वुड्स फेज १ व २ मधील रहिवाशांना होणार त्रास दुर करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) यासंदर्भात पायोनियर वुडस फेज १ व २ येथील वसाहतीमध्ये गटार व सांडपाणी यंत्रणेतील उणिवा दूर करण्याबाबत अध्यक्ष, पायोनियर वुडस सोसायटी यांना दि.१४.०२.२०१८ रोजीच्या पत्रान्वये नगरपरिषदेने कळविले होते. त्यानुसार सोसायटीने काम केले असल्याचे व त्यानंतर यासंदर्भात नागरिकांच्या कोणत्याही तक्रारी नगरपरिषदेकडे प्राप्त झाल्या नसल्याचे जिल्हाधिकारी, नागपूर यांनी कळविले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अंधेरी के-पश्चिम वार्ड मधील हस्तांतरीत नियुक्त अधिकारी यांच्याकडून एमआरडीपी ॲक्ट अंतर्गत कारवाई करण्यात येत नसल्याबाबत**

**(१५) १०१४६० (०६-०१-२०१८). श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अंधेरी के-पश्चिम वार्ड मधील श्री.बिपीन खराडे, हस्तांतरीत नियुक्त अधिकारी यांच्याकडून एमआरडीपी ॲक्टच्या कलम ५३(१) अन्वये क्षितीज कमर्शियल बिल्डिंग, आंबोली, क्रिस्टल प्लाझा, ओशिवरा, लोटस लॉजेस्टीक प्रा.लि., आंबोली, मे.रोझ व्हॅले, ओशिवरा, आकाशदीप सबीर, ओशिवरा, आनंद सागर कॉ सोसायटी, आझाद नगर, मोर्य

ब्लू मून, लिंकरोड, भगवती हाऊस, ओशिवरा, फॉरच्युन टेरेस, ओशिवरा, सत्यदेव, ओशिवरा या विकासकांना नोटिसा बजावल्यानंतर त्यांची मुदत संपल्यानंतरही विकासकाशी संगनमत करून पुढील कारवाई करण्यास जाणीवपूर्वक विलंब करण्यात येत असल्यामुळे या प्रकरणी चौकशी करुन त्यांच्याविरोधात कारवाई करण्यात यावी असे श्री.इफतेखार ए.शहा,माहिती अधिकार कार्यकर्ता व सामाजिक कार्यकर्ता यांनी तसेच जनजागृती अभियान, मुंबई यांनी महानगरपालिका उपआयुक्त, परिमंडळ-४, सहाय्यक आयुक्त, अंधेरी के-पश्चिम वॉर्ड, आयुक्त बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडे दिनांक ३ मार्च, २०१६, दिनांक ३ ऑक्टोबर, २०१७ व तद्पूर्वी मागील २ वर्षापासून सातत्याने निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास,सदरहू निवेदनानुषंगाने श्री.बिपीन खराडे यांच्याविरोधात कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१८) :** (१) सदर प्रकरणी श्री. इफ्तेखार ए. शाह यांनी केलेल्या तक्रारी बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त झाल्या आहेत.

(२) सदर प्रकरणी श्री.बिपीन खराडे यांच्यावर बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खात्यांतर्गत चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई महानगरपालिकेच्या अ, ब, क, ड, ई या विभागांमधील इमारतींच्या पुनर्निमाणाच्या प्रस्तावाबाबत

**(१६) १०१७३८ (१२-०२-२०१८). श्री.राज पुरोहित (कुलाबा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या अ, ब, क, ड, ई या विभागांमध्ये उपकर प्राप्त व उपकर प्राप्त नसलेल्या किती इमारती आहेत,

(२) असल्यास, त्याचा तपशील काय आहे,

(३) असल्यास, किती उपकर प्राप्त नसलेल्या इमारतींच्या पुनर्निमाणाचे प्रस्ताव इमारत प्रशासनाकडे आले व त्याचा तपशील काय आहे,

(४) असल्यास, किती प्रकल्प पूर्ण झाले आहेत व किती प्रकल्प अपुर्ण आहेत व त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१८) :** (१) व (२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अ, ब, क, ड, ई या विभागांमध्ये एकूण ३६,४३३ मालमत्तांपैकी ११,७०३ दुरुस्ती उपकर प्राप्त इमारती असून त्याचा विभागवार तपशील खालीलप्रमाणे आहे :-

| विभाग | एकूण मालमत्ता | दुरुस्ती उपकरप्राप्त इमारती |
|---|---|---|
| ए | ५२३६ | १०३९ |

| | | |
|---|---|---|
| बी | ३९४० | १३४० |
| सी | ६०५२ | ३३६३ |
| डी | ११,५५४ | ३३७८ |
| ई | ९६५१ | २५८३ |
| एकूण | ३६,४३३ | ११,७०३ |

(३) व (४) सन २०१५-१६ व सन २०१६-१७ मध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेस उपकर प्राप्त व उपकर प्राप्त नसलेल्या एकूण २९५ इमारतींचे प्रस्ताव प्राप्त झाले असून, ४८ प्रकल्प पूर्ण झाले आहेत व २४७ प्रकल्प प्रगतीपथावर आहेत.

प्रगतीपथावर असलेल्या प्रकल्पाच्या वास्तुविशारदांनी इमारत पूर्णत्वाचा दाखला व भोगवटा प्रमाणपत्रासाठी महानगरपालिकेकडे अद्यापपर्यंत अर्ज केलेला नाही.

---

**महानगरपालिका शाळांमधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी सी.सी.टीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत**

**(१७) १०२२४६ (०३-०१-२०१८). डॉ.आशिष देशमुख (काटोल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गुरुग्राम येथील रायन इंटरनॅशनल शाळेत झालेल्या विद्यार्थ्याच्या हत्त्येनंतर देशभरात भीतीचे वातावरण पसरले असून मुंबईतील शाळामधूनही विद्यार्थ्यांसोबत अनेकवेळा गैरप्रकार केले जात आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागांतर्गत ४१७ शाळा चालविण्यात येतात त्यात २२७ शाळा या भाड़ेतत्वावरील इमारतीत भरवल्या जातात तसेच मालमता विभागाच्या इमारतीत ३३ शाळा व भाडेतत्वावर २४ अशा एकूण ७०१ शाळांच्या इमारती महानगरपालिकेच्या अखत्यारीत येत असून यात जवळपास ३ लाख ४६ हजार ७४२ विद्यार्थ्यी शिक्षण घेत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महानगरपालिका शाळांमध्ये सुरक्षतेचा प्रश्न निर्माण झाला असल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी महानगरपालिका शाळांमध्ये त्वरित सी.सी टीव्ही कॅमेरे बसविण्याकरीता शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१८) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारीतील शाळांमध्ये अशा प्रकारची घटना घडल्याची तक्रार प्राप्त झाली नसल्याचे महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत मराठी, हिंदी, गुजराती, तामिळ, तेलगू, कन्नड, इंग्रजी व उर्दू माध्यम अशा एकूण ८ माध्यमाच्या शाळा महानगरपालिकेच्या स्वमालकीच्या ४७४ इमारती व भाडयाच्या २२७ इमारती अशा एकूण ७०१ शालेय इमारतींमध्ये चालविल्या जातात.

सदर शालेय इमारतींमध्ये मनपा प्राथमिक व माध्यमिक शाळांतील एकूण २,९६,८१५ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

(३) महानगरपालिका शालेय इमारतीमधून विद्यार्थी व सामग्रीच्या संरक्षणासाठी कंत्राटी सुरक्षा कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे.

शाळेतील विद्यार्थी, शिक्षक असे मानव संसाधन, शालेय परिसर, शालेय इमारत, साधनसामुग्री आदि भौतिक सुविधांना असामाजिक तत्वांपासून, समाजकंटकांपासून सुरक्षितता मिळण्यास मदत होण्याच्या दृष्टीने सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविण्याकरिता महानगरपालिका शाळांचे सर्वेक्षण पूर्ण झाले असून, सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पात आर्थिक तरतूद करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ, मुंबई येथे शेड बॅकची तात्काळ अंमलबजावणी होण्याबाबत**

**(१८) १०३३३८ (१२-०२-२०१८). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जी/दक्षिण विभाग कार्यालयाच्या अखत्यारीतील सीताराम जाधव मार्ग हा लोअर परळ रेल्वे स्थानक ते सेनापती बापट मार्ग यांना जोडणाऱ्या अत्यंत अरुंद रस्त्यावर परिसरात वसलेल्या अनेक औद्योगिक वसाहतीमुळे नेहमी प्रचंड वर्दळ असल्याने या मार्गावरील उर्मी इस्टेट (पूर्वीची जालन डाइंग) या औद्योगिक वसाहतीचा पुनर्विकास करताना अनेक बांधकामांना देण्यात आलेल्या ओ.सी. मधील अटी व शर्तीनुसार शेड बॅक देणे बंधनकारक असल्याने सदरहू औद्योगिक वसाहतीची कंपाऊंड भिंत तोडून सदरहू मार्ग तातडीने रुंद करण्यात यावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे ऑगस्ट, २०१७ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्या दरम्यान आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका तसेच शासनाकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ, मुंबई येथे शेड बॅकची तात्काळ अंमलबजावणी करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ, मुंबई येथील उर्मी इस्ट्रेट (पूर्वीची जालन डाईंग) स.न. १५६ या भूखंडापैकी रस्ता रुंदीकरणात बाधीत (सेटबॅक) २४१.६९ चौ.मी. इतक्या जागेचा ताबा महानगरपालिकेमार्फत दिनांक २९.०१.२०१८ रोजी घेण्यात आला आहे.

सदर सेटबॅक अंतर्गत बाधीत संरक्षण भिंतीचे प्रत्यक्ष निष्कासन, सदर रस्त्यावरील इतर बाधीत बांधकामाच्या निष्कासनावेळी करण्यात येणार आहे.

तसेच सदर रस्यावरील इतर भूखंडांपैकी सेटबॅक ताब्यात घेण्याची नोटीस प्रक्रिया बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

---

**मुंबई शहर-उपनगरांतील सुमारे तीन लाख इमारतींवर बिल्डिंग इन्स्पेक्शन सिस्टिम या सॉफ्टवेअरच्या माध्यमातून लक्ष ठेवण्यात येणार असल्याबाबत**

**(१९) १०४८२४ (१४-०४-२०१८). श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर व उपनगरात माहे डिसेंबर, २०१७ ते जानेवारी, २०१८ च्या पहिल्या आठवड्यात किती ठिकाणी आगी लागण्याच्या घटना घडल्या आहेत,

(२) असल्यास, ठिकठिकाणी लागलेल्या आगीच्या पार्श्वभूमीवर अग्निशमन दल मुंबई शहर-उपनगरांतील सुमारे तीन लाख इमारतींवर बिल्डिंग इन्स्पेक्शन सिस्टिम या सॉफ्टवेअरच्या माध्यमातून लक्ष ठेवणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ज्या भागात आगी लागल्या त्या भागात अग्निशमनासाठी काय व्यवस्था करण्यात आली होती व या सर्व व्यावसायिक व रहिवाश्यांनी अग्निशमन व्यवस्था न केल्याने तसेच सोसायट्यांकडून अग्निप्रतिबंधक यंत्रणा राबविण्यास टाळाटाळ होत असल्यास त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०६-२०१८) :** (१) माहे डिसेंबर, २०१७ मध्ये मुंबई शहर व उपनगरात अनुक्रमे ६० व ७६ आणि जानेवारी, २०१८ च्या पहिल्या आठवडयात अनुक्रमे ४० व ६६ ठिकाणी आगी लागल्याच्या घटना घडल्या आहेत.

(२) अशा प्रकारची प्रणाली विकसित करण्याची प्रक्रिया महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

(३) मुंबई शहर व उपनगरात ज्या भागात आगी लागल्या, तेथील आगी महानगरपालिकेमार्फत प्रचलित पध्दतीप्रमाणे विझविण्यात आल्या.

व्यावसायिक व राहत्या सोसायटयांमधून अग्निप्रतिबंधक यंत्रणा बसविण्यास टाळाटाळ होत असेल अशा सोसायटयांचे मालक/भोगवटादार यांच्यावर महानगरपालिकेमार्फत महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ नुसार कारवाई करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई मॅरेथॉनचे आयोजक प्रोकॅम इंटरनॅशनल लि.यांच्याकडून बेकायदा बॅनर लावण्याबाबत दंडाची रक्कम वसुल करण्याबाबत**

**(२०) १०५०१६ (०३-०४-२०१८). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्टॅण्डर्ट चार्टर्ड मुंबई मॅरेथॉनचे आयोजक प्रोकॅम इंटरनॅशनल लि. ने बेकायदा बॅनर लावण्याप्रकरणी २ कोटी ५१ लाख १५ हजार ३०५ रुपये इतकी दंडाची रक्कम वसुल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(२) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१८) :** (१) व (२) स्टॅण्डर्ड चार्टर्ड मुंबई मॅरेथॉनचे आयोजक मे. प्रोकॅम इंटरनॅशनल लि. यांचेकडून रु. २ कोटी ५१ लाख १५ हजार ३०५ इतकी दंडाची रक्कम वसुल करण्याबाबत मे. प्रोकॅम इंटरनॅशनल लि. यांना बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले होते.

तथापि, सदर प्रकरणी मा. उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या रिट याचिका क्रमांक २५३३/२०१७ मधील दिनांक १२.०१.२०१८ रोजीच्या आदेशानुसार, मे. प्रोकॅम इंटरनॅशनल यांनी मुंबई मॅरेथॉन २०१८ व लेझर शो चे जाहिरात शुल्क, भुईभाडे वसुलीचे रु. २६ लक्ष व सुरक्षा अनामत रक्कम म्हणून  रु. ७९.६० इतक्या रकमेचा महानगरपालिकेकडे भरणा केला आहे.

सद्य:स्थितीत सदर प्रकरण मा.उच्च न्यायालयात न्यायप्रविष्ठ असून, मा.न्यायालयाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही महानगरपालिकेमार्फत करण्यात येणार आहे.

---

**उरण, पनवेल, कळंबोली (जि.रायगड) परिसराला पाणी पुरवठा करणा-या टाक्या जीर्ण झाल्या असून या टाक्यांचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याबाबत**

**(२१) १०५०३३ (०३-०४-२०१८). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उरण, पनवेल, कळंबोली (जि.रायगड) परिसराला पाणी पुरवठा करणा-या टाक्या जीर्ण झाल्या असून या टाक्यांचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचे आदेश माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान महानगरपालिका अधिका-यांना देण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या आदेशानुसार स्ट्रक्चरल ऑडिटचे काम पूर्ण करण्यात आले आहे काय, त्याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०७-२०१८) :** (१) व (२) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आदेशान्वये पनवेल व कळंबोली येथील पाण्याच्या टाक्यांचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात आले. उक्त अहवालानुसार जे उंच जलकुंभ धोकादायक नाही व वापरण्या योग्य आहेत अशा २७ जलकुंभांची दुरूस्ती करण्याचे  सुचविले आहे.

तसेच जी धोकादायक आहेत आणि दुरूस्ती योग्य नाही अशा ६ टाक्या तोडण्याची शिफारस केली आहे.

उपरोक्त अहवालनुसार पनवेल महानगरपालिका स्तरावर पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

उरण नगरपरिषदेस पाणी पुरवठा करणाऱ्या दोन्ही टाक्या सुस्थितीत असल्याचे उरण नगरपरिषद यांनी कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वांद्रे-कुर्ला संकुलातील (मुंबई) जागतिक वित्तीय केंद्र गुजरात मधील गिफ्ट सिटीमध्ये वळविण्यात आल्याबाबत**

**(२२) १०५१५२ (१२-०४-२०१८). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांद्रे-कुर्ला संकुलातील (मुंबई) प्रस्तावित जागतिक वित्तीय केंद्र गुजरात मधील गिफ्ट सिटीमध्ये वळवून तोट्यात चालणारी गिफ्टसिटी फायद्यात आणण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वित्तीय केंद्रासाठी ५० हेक्टरची जागा लागते हे कारण देऊन हा प्रकल्प गुजरातकडे वळवून महाराष्ट्रातील जनतेची दिशाभूल करण्यात येत आहे, हे ही खेर आहे काय,

(३) असल्यास, बुलेट ट्रेन सारख्या प्रकल्पासाठी पैसे उभारतांना मुंबईसाठी असलेला उन्नत रेल्वेमार्ग प्रकल्प ही रद्द करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, त्यानुसार जागतिक वित्तीय केंद्र उभारण्याबाबतची स्थिती तसेच उन्नत रेल्वेमार्ग प्रकल्प रद्द करण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०७-२०१८) :** (१) व (२) नाही.

(३) व (४) वांद्रे ते विरार उन्नत रेल्वे मार्गाऐवजी बोरीवली ते विरार दरम्यान पाचवी व सहावी मार्गिकेचे काम तसेच हार्बरमार्गाचा गोरेगांव ते बोरीवली पर्यंत विस्तार करण्याचे काम मुंबई नागरी परिवहन प्रकल्प-३अे अंतर्गत हाती घेण्याचे रेल्वेने प्रस्तावित केले आहे. आंतरराष्ट्रीय वित्तीय सेवा केंद्रासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने जी टेक्स ब्लॉक, बीकेसी येथे ५०.३१ हेक्टर क्षेत्र निश्चित केले आहे. सदर जी टेक्स ब्लॉक, बीकेसी मधील क्षेत्रापैकी ४.२ हेक्टर क्षेत्र तात्पुरते व ०.९ हेक्टर क्षेत्र कायमस्वरुपी दिनांक २६.०२.२०१८ पासून चार वर्षासाठी बुलेट ट्रेनच्या भूमिगत टर्मिनलच्या बांधकामासाठी दिनांक १२.०९.२०१७

रोजीच्या शासन निर्णयातील अटी व शर्तीवर हाय स्पीड रेल कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. यांना देण्यात आले आहे. आंतरराष्ट्रीय वित्तीय सेवा केंद्र व बुलेट ट्रेन हे दोन्ही प्रकल्प एकाच ठिकाणी राबविण्याचे प्रयत्न आहेत.

---

**हेदुटणे (ता.पनवेल, जि.रायगड) गावातील नैना फेज २ अंतर्गत २०१ गावांना गावठाण दर्जा देण्याबाबत**

**(२३) १०५१७३ (१४-०४-२०१८). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हेदुटणे (ता.पनवेल, जि.रायगड) गाव नैना फेज २ अंतर्गत २०१ गावांची विकास योजना तयार करण्यात आली असून तसा विकास आराखडयाचा मसुदा तयार करण्यात आला असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, हेदुटणे गावाचे गावठाण महसूली गावठाण असले तरी महसूली अभिलेखानुसार लोकवस्ती नसलेले क्षेत्र दाखविण्यात आल्यामुळे विकासकामांना अडचण निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नैना क्षेत्रातील इतर गावांच्या गावठाणांना निवासी क्षेत्राचा दर्जा दिला असून हेदुटणे गावठाणास निवासी क्षेत्राचा दर्जा दिला नसल्यामुळे गावाचा विकास होत नसून अनेक मुलभुत सुविधाही मिळत नाही, हे ही खर आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून हेदुटणे गावातील नैना फेज २ अंतर्गत २०१ गावांचा विकासासंदर्भात गावाला गावठाण दर्जा देण्याबाबत कोणती उपायायोजना वा कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०८-२०१८) :** (१) होय.

(२) व (३) हेदुटणे गांवठाण हे महसुली गावठाण असले तरी महसुली अभिलेखानूसार लोकवस्ती नसलेले क्षेत्र असल्याने सिडकोने प्रारुप विकास योजनेत लोकवस्ती नसलेले क्षेत्र असे दर्शविले आहे. प्रारुप विकास योजना सिडकोने शासनास दिनांक २२/९/२०१७ रोजी मंजूरीकरीता सादर केली असून, सदर प्रारुप विकास योजनेवर संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय मागविण्यात आले आहेत. प्रारुप विकास योजना मंजूर करताना याबाबत उचित निर्णय घेण्याची शासनाची भूमिका आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पनवेलमधील (जि.रायगड) २३ ग्रामपंचायतीतील कर्मचा-यांना मगील दोन महिन्यांपासून वेतन मिळाले नसल्याबाबत**

**(२४) १०५२६१ (१८-०४-२०१८). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेलमधील (जि.रायगड) २३ ग्रामपंचायतीतील कर्मचा-यांना मगील दोन महिन्यांपासून वेतन मिळाले नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पालिका अस्तित्वात येण्यापूर्वी काही ग्रामपंचयातींनी नियमबाहय भरती केल्या प्रकरणी चौकशी करण्याचे आदेश आयुक्तांनी दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०७-२०१८) :** (१), (२) व (३) नाही.

पनवेल महानगरपालिकेमार्फत २३ ग्रामपंचायतीमधील कर्मचाऱ्यांना वेळीच दरमहा वेतन अदा करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवी मुंबई कोपरखैरणे सेक्टर-१९ येथे पोलीस स्टेशन बांधण्यासाठी भूखंड उपलब्ध करून देण्याबाबत**

**(२५) १०५३८६ (१८-०४-२०१८). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई कोपरखैरणे सेक्टर-१९ येथे पोलीस स्टेशन बांधण्यासाठी भूखंड उपलब्ध करून देऊन सिडकोने पोलीस स्टेशन बांधून देण्यात यावे म्हणून स्थानिक लोकप्रतिनिधींनी व्यवस्थापकीय संचालक सिडको यांना माहे जुन, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०८-२०१८) :** (१) व (२) नवी मुंबई कोपरखैरणे सेक्टर-१९ येथे पोलीस स्टेशन बांधण्यासाठी भूखंड उपलब्ध करून देऊन सिडकोने पोलीस स्टेशन बांधून देण्याच्या अनुषंगाने निवेदन सिडको महामंडळास प्राप्त झालेले नाही, असे सिडकोने कळविले आहे.

तथापि, सिडकोच्या भू-मुल्य आकारणी आणि भू-विनियोग धोरणान्वये पोलीस विभागास पोलीस स्टेशन / पोलीस चौकीसाठी फक्त जलउगम स्त्रोत शुल्क आकारून विनाशुल्क भूखंड वाटप करण्याचे धोरण आहे. तसेच सिडको महामंडळाने अद्यापपर्यंत नवी मुंबई पोलीस आयुक्त यांनी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने कोपरखैरणे येथील सेक्टर २० मधील भूखंड क्र.७ (क्षेत्र १९८९.८२६ चौ.मी.) हा दि.०९.०१.२००४ रोजी व सेक्टर १० मधील भूखंड क्र.९अ (क्षेत्र १२१.२५७ चौ.मी.) हा दि.०५.०३.२०१३ रोजी पोलीस ठाण्याकरिता वाटप केला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांना नागरी सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत

**(२६) १०५४०२ (१८-०४-२०१८). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांना नागरी सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सिडकोकडे नाममात्र दराने भूखंड हस्तांतरित करून मिळावेत म्हणून नवी मुंबई महानगरपालिकेने सिडकोकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भूखंड हस्तांतरित करण्याबाबत शासनाने देखील सिडकोला आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सिडकोने आजपर्यंत किती भूखंड नवी मुंबई महानगरपालिकेकडे हस्तांतरित केले आहेत,
(४) असल्यास, उर्वरित भूखंड नाममात्र दराने कायमस्वरूपी हस्तांतरित करणेबाबत सिडकोस्तरावरून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे व कधीपर्यंत भूखंड हस्तांतरित करून मिळणे अपेक्षित आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०७-२०१८) :** (१) व (२) होय.
(३) व (४) नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील नागरीकांना नागरी सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी सिडकोमार्फत आजपर्यंत एकूण ५८७ भूखंड नवी मुंबई महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्यात आले असून २०२ भूखंडाच्या भाडेपट्टाकरारनाम्यांचे नुतनीकरण करण्याची प्रक्रिया सुरु आहे. त्यापैकी १४७ भूखंडांची शुल्क भरणापत्र दिले असून नवी मुंबई महानगरपालिकेने १५ भूखंडांचे शुल्क भरणा केले आहे. अशाप्रकारे नवी मुंबई महानगरपालिकेस भूखंड हस्तांतरीत करण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालेगांव (ता.जि.नाशिक) येथे मुलभूत सुविधा नसल्याबाबत**

**(२७) १०५४४५ (१४-०४-२०१८). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (ता.जि.नाशिक) ही "ड" वर्ग महानगरपालिका असून सदर महानगरपालिकेला उत्पन्नाचे साधन कमी असल्याने मालेगांव येथे मुलभूत सुविधा नसल्याचे व रस्त्याची दुरवस्था झाली असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मालेगांव महानगरपालिका क्षेत्रामध्ये ७०% लोक दारिद्रय रेषेखाली जीवन जगत असून आर्थिक परिस्थिती बिकट असल्याने त्यांची घरेही छोटी आहेत त्यामुळे विद्यार्थ्यांना अभ्यास करतांना अडचणी निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू विद्यार्थ्यांना छोटयाशा रुमध्ये अभ्यास करणे त्रासदायक ठरत असल्याने त्याकरिता स्टडी रुम बांधणे व इतर विकास कामे मालेगांव महानगरपालिका ड- वर्ग असल्याने आवश्यक ५ ते १० कोटींचा विकास निधी देण्यात यावा व सदर काम अभियंता, सा.बां.विभाग मालेगांव यांच्यामार्फत करण्याबाबतचा प्रस्ताव मा.मुख्यमंत्री यांना देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०६-२०१८) :** (१) मालेगाव महानगरपालिकेची उत्पन्नाची साधने ही मर्यादीत आहेत.

तथापि, मुलभूत सुविधा महानगरपालिकेमार्फत पुरविण्यात येत आहेत. तसेच, महानगरपालिकेच्या वार्षिक मंजूर मक्तेदार यांचेकडून रस्ता दुरुस्तीची कामे करुन घेण्यात आली आहेत.

(२), (३) व (४) मालेगाव शहर हे यंत्रमागाचे शहर असल्याने मोठ्या प्रमाणात मजूर व कर्मचारी वर्गाची संख्या आहे.

मालेगाव महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद योजनेंतर्गत नगर विकास विभागाच्या दिनांक २८/०३/२०१६ व दिनांक २७ डिसेंबर, २०१६ च्या शासन निर्णयान्वये, रु.१८.५० कोटींच्या एकूण २६ कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. सदर २६ कामांपैकी बहुतांश कामे ही रस्ता दुरुस्तीची असून उर्वरीत कामात पूलाचे बांधकाम, कॉंक्रीट गटार, जिमखाना इमारत, मोकळ्या भूखंडास कुंपण करणे अशा स्वरुपाची कामे आहेत. तथापि, स्टडी रुम बांधणे या प्रकारचे कुठलेही काम यात समाविष्ट नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वसई-विरार महानगरपालिकेने कंत्राटी कर्मचारी पुरविण्याचा ठेका दिलेल्या दिव्या एंटरप्रायजेसने केलेली अनियमितात**

**(२८) १०६३७१ (१२-०४-२०१८). श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री.मनोज पाटील यांनी वसई-विरार म.न.पा.चे आयुक्त, कामगार मंत्री, कामगार आयुक्त, भविष्य निर्वाह निधी आयुक्त, एसीबी आयुक्त, विक्रीकर विभाग, कर्मचारी राज्य विमा आयोग इ.कडे लेखी तक्रार करुन वसई-विरार महानगरपालिकेमध्ये कमलेश ठाकूर यांच्या दिव्या एंटरप्रायजेस तर्फे महानगरपालिकेच्या बांधकाम अतिक्रमण, नगररचना, दिवाबत्ती इ.विभागांसाठी अभियंते, कर्मचारी, संगणकचालक, आरोग्य निरीक्षक, विधी सल्लागार पुरविण्याचा ठेका सन २०१२ मध्ये घेतल्यानंतर या ठेकेदाराने महानगरपालिका बरोबर केलेल्या शर्ती-अटीनुसार तसेच केंद्र व राज्य शासनाच्या कोणत्याही नियमांचे पालन न करता कोटयवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याबाबतची लेखी तक्रार केल्याचे दिनांक २४ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिव्या एंटरप्रायजेसने नेमलेल्या कर्मचाऱ्यांमध्ये ६० संगणकचालक, ३ लघु टंकलेखक, १० स्वच्छता निरीक्षक, एक विधी सल्लागार व ८६ अभियंते असे १६० कर्मचारी ठेका पध्दतीवर काम करीत असताना स्वत: कमलेश ठाकूर अभियंता म्हणून माहे फेब्रुवारी, २०१६ पासून महानगरपालिकेत कार्यरत होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ठेकेदाराने महानगरपालिकेशी झालेल्या करारानुसार कर्मचाऱ्यांची वेतन देयके मंजूर करताना देयकासोबत हजेरीपत्रक, पगारपत्रक, भविष्य निर्वाह निधी, कर्मचारी विमा योजना यांची चलने तसेच सेवाकर, व्यवसाय कर इ.चा भरणा केल्याची चलने न जोडता कोणत्याही नियमांचे पालन न करता महानगरपालिकेने कमलेश ठाकूर यांच्या दिव्या एंटरप्रायजेसच्या खात्यावर लाखो रुपयांची बिले अदा केल्याने हा बेकायदेशीर व्यवहार करणाऱ्या महानगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) असल्यास, शासनाचा सेवाकर व व्यवसाय कर दिव्या एंटरप्रायजेसने नियमाप्रमाणे भरणे अपेक्षित असतानाही १ कोटी १० लाखांहून अधिक रकमेचा कमलेश ठाकूर यांनी केलेला अपहार याबाबत मनोज पाटील यांनी पुराव्यांसह सर्व कागदपत्रे जोडून लेखी तक्रार करुनही त्यांच्या तक्रारीची दखल न घेता या सर्व गैरव्यवहाराची चौकशी न करणाऱ्या संबंधित सर्व अधिकाऱ्यांविरोधात कर्तव्यात कसूर व अक्षम्य विलंब केल्याप्रकरणी कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०७-२०१८) :** (१) होय.

अशा प्रकाराची तक्रार वसई-विरार शहर महानगरपालिकेस दिनांक २०.११.२०१७ रोजी प्राप्त झाली आहे.

(२) सन २०१४-१५ करीता वसई-विरार शहर महानगरपालिकेने अभियंता, विधी अधिकारी, संगणक चालक, लिपीक, लघु टंकलेखक, स्वच्छता निरीक्षक असे २०२ कंत्राटी कर्मचारी पुरविण्याचा ठेका मे.दिव्या एंटरप्रायजेस यांना दिनांक ३०.०७.२०१४ च्या कार्यादेशान्वये दिला.

दिनांक २८.०२.२०१८ रोजी ठेका संपुष्टात आला. त्यावेळी ठेकेदारामार्फत वसई विरार शहर महानगरपालिकेस १९८ कंत्राटी कर्मचारी पुरविण्यात येत होते.

श्री.कमलेश ठाकूर स्वत: कंत्राटी पध्दतीने कनिष्ठ अभियंता या पदावर दिनांक ३१.०३.२०१६ पर्यंत कार्यरत होते.

(३) व (४) या प्रकरणी प्रथम दर्शनी वसई विरार शहर महानगरपालिका पातळीवर अनियमितता घडले असल्याचे दिसून आल्याने या प्रकरणी अधिक चौकशी करण्याच्या सूचना विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांना देण्यात आल्या आहेत.

सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर वसई विरार शहर महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी कर्तव्य कसूर केल्याचे आढळल्यास त्यांच्या विरोधात आवश्यक कारवाई करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पनवेल महानगरपालिका हद्दीतील सिडकोने निर्माण केलेल्या खारघर येथील सेक्टर १५ घरकुल स्पॅगेटी व सेक्टर १६ व १७ येथील सेलेब्रेशन वसाहतीतील निकृष्ट दर्जाच्या इमारतींची पुनर्बांधणी करण्याबाबत**

**(२९) १०६४७५ (१४-०४-२०१८). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल महानगरपालिका हद्दीतील सिडकोने निर्माण केलेल्या खारघर येथील सेक्टर १५ घरकुल स्पॅगेटी व सेक्टर १६ व १७ येथील सेलेब्रेशन वसाहतीतील गत चार ते पाच वर्षापूर्वी उभारलेल्या निकृष्ट दर्जाच्या इमारतींची पुनर्बांधणी तातडीने करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान सह व्यवस्थापकीय संचालक, सिडको लि. यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बांधकाम करतेवेळी देण्यात आलेल्या रंगानंतर अद्यापपर्यंत इमारतीला रंग देण्यात आलेला नाही तसेच इमारतींच्या प्लॅस्टरला तडे गेले आहेत, टेरेस व पाण्याच्या टाक्या गळत्या झाल्या आहेत, जिन्यातील सिलिंगलाही तडे गेल्यामुळे सदनिका धारकांच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त परिसरात जिर्ण झालेली ड्रेनेज लाईन फुटल्यामुळे पसरलेल्या सांडपाण्याच्या दुर्गंधीमुळे डासांचे प्रमाण वाढले असून नागरिकांच्या जिवीताला धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सिडकोमार्फत उभारलेल्या निकृष्ट दर्जाच्या इमारतींची तातडीने पुनर्बांधणी करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०८-२०१८) :** (१) सिडकोने निर्माण केलेल्या घरकुल व स्पॅगेटी गृहनिर्माण योजनेबाबत निवेदन प्राप्त झाले आहे, हे खरे आहे.

(२), (३), (४) हे खरे नाही.

घरकुल गृहनिर्माण योजनेतील इमारती सन २००२ ते २००४ दरम्यान, स्पॅगेटी गृहनिर्माण योजनेतील इमारती सन २००४ मध्ये आणि सेलेब्रेशन गृहनिर्माण योजनेतील इमारती सन २०१० मध्ये संबंधित गृहनिर्माण संस्थेमधील रहिवाशांना हस्तांतरित करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे इमारतींना रंग देणे प्लॅस्टरचे तडे, टेरेस व पाण्याच्या टाक्यांच्या गळती, अंतर्गत ड्रेनेज लाईन इ.ची देखभाल व दुरुस्ती करण्याची जबाबदारी ही संबंधित गृहनिर्माण योजनेच्या संस्थांची आहे.

स्थानिक रहिवाश्यांच्या विनंतीनुसार गृहनिर्माण योजनेमधील इमारतींची संरचनात्मक तपासणी सन २०१४ मध्ये "स्ट्रक्वेल डिझायनर ॲण्ड कन्सल्टन्ट्स प्रा.लि." यांच्याकडून करण्यात आली असून त्यांच्या अहवालानुसार संबंधित इमारतींचा सांगाडा स्थिर व सुरक्षीत आहे. त्यामुळे या इमारतींची नियमीत देखभाल व दुरुस्ती केल्यास इमारतीचा वापर कालावधी वाढणार आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई उपनगरातील गोरेगावमधील सिध्दार्थनगरातील पत्राचाळीच्या पुनर्विकास प्रकल्पाबाबत**

**(३०) १०६५०३ (०३-०४-२०१८). श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील गोरेगावमधील सिध्दार्थनगरातील पत्राचाळीच्या पुनर्विकास प्रकल्पाबाबत म्हाडाच्या अधिका-यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांना चुकीचा अहवाल दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.मुख्यमंत्री यांना उक्त पुनर्विकास प्रकल्पाबाबत चुकीचा अहवाल सादर करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (३१-०७-२०१८) :** (१) मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ यांचेकडून प्राप्त अहवालानुसार, अंशत: खरे आहे.

(२) उक्त पुनर्विकास प्रकल्पातील पुनर्वसन हिश्श्याचे काम ८७% पुर्ण झाल्याचा अहवाल दि. २२.११.२०१७ रोजी शासनस्तरावरील बैठकीत देण्यात आला. तथापि प्रत्यक्षात बरेच काम प्रलंबित असल्याचे रहिवाशांनी सदरहु बैठकीत निदर्शनास आणुन दिले. याबाबत चुकीचा अहवाल दिल्याच्या कारणावरुन संबंधित कार्यकारी अभियंता यांना दि. २२.११.२०१७ च्या म्हाडाच्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले असून सद्य:स्थितीत त्यांची खातेनिहाय चौकशी प्रस्तावित आहे, असे म्हाडाच्या अहवालात नमूद करण्यात आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भिवंडी (जि.ठाणे) महानगरपालिका हद्दीतील शौचालयांची देखभाल दुरुस्ती न करणाऱ्या व पाणीपट्टी न भरणाऱ्या संस्थाचालकांवर कारवाई करण्याबाबत**

**(३१) १०६६२५ (१९-०४-२०१८). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) महानगरपालिका हद्दीतील एमएमआरडीएच्या निधीतून २१० शौचालये बांधण्यासाठी निधी दिलेला असताना २०७ शौचालये बांधून त्यांच्या देखभाल दुरुस्तीची कामे शहराबाहेरील संस्थांना दिलेली असून या संस्थांनी गत आठ वर्षात पाणीपट्टी व मलकर भरणा केला नसल्याने महानगरपालिकेने त्यांना वारंवार नोटीसा बजावल्याचे माहे डिसेंबर,२०१७ मध्ये वा त्या दरम्यानच्या कालावधीमध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय निदर्शनास आले तदनुसार शौचालयांची देखभाल दुरुस्ती न करणाऱ्या व महानगरपालिकेची पाणीपट्टी व मलकर भरणा न करणाऱ्या संस्थाचालकांवर तसेच त्यांना पाठीशी घालणाऱ्या महानगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०७-२०१८) :** (१) भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेस एकूण २०७ शौचालये बांधण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी निधी उपलब्ध करुन दिला होता.

उपरोक्त सर्व शौचालयाचे बांधकाम व परिचलन भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेमार्फत केले आहे. तसेच या शौचालयांना पाणीपट्टी आकारण्यात येत नाही.

तथापि, बोअरवेल व टँकरचा वापर न करता नळाचा वापर करणाऱ्या संस्था / सेवाभावी संस्थांचालकाविरुध्द करारनाम्यातील तरतुदीनुसार महानगरपालिका कारवाई करणार आहे.

(२) भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेने स्वच्छता विषयक तसेच प्राप्त झालेल्या तक्रारीनुसार ३ संस्था चालकांचे करारनामे रद्द केले आहेत.

या प्रकरणी चौकशी करुन अधिकारी/कर्मचारी यांच्या स्तरावर कर्तव्यकसुर आढळल्यास संबंधितावर कारवाई करण्याच्या सूचना आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका यांना देण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक शहरातील सिडकोच्या अधिसूचित क्षेत्रातील भाडेपट्ट्याने वाटप केलेल्या मिळकती फ्री होल्ड करण्याबाबत**

**(३२) १०६६४८ (१७-०४-२०१८). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरातील सिडकोच्या अधिसूचित क्षेत्रातील भाडेपट्ट्याने वाटप केलेल्या मिळकती फ्री होल्ड करण्यासंदर्भात दिनांक ११ ऑगस्ट, २०१७ रोजी सिडको संचालक मंडळाच्या बैठकीत ठराव करण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नाशिक सिडको परिसरातील सहकारी गृहनिर्माण सोसायट्यांचे खरेदी खत पूर्ववत करून स्वतंत्र ७/१२ मिळणे आणि सदर जमिनी संस्थांना मालकी हक्काने फ्री होल्ड करून मिळणेसाठी दिनांक ८ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) नुसार सिडकोच्या अधिसूचित क्षेत्रातील मिळकती फ्री होल्ड करण्यासंदर्भात शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०८-२०१८) :** (१) व (२) होय.
(३) नवी मुंबई जमीन विनियोग विनियम (सुधारित),२००८ नुसार भाडेपट्ट्याने देण्यात आलेल्या मालमत्तांच्या हस्तांतरण व वापर बदलाबाबत निश्चित करण्यात आलेल्या काही अटी व शर्ती शिथील करुन भाडेपट्टा करारनाम्याच्या कालावधीत सुधारणा करण्याबाबतचा संचालक मंडळाने पारित केलेला दि.११.०८.२०१७ चा ठराव क्रमांक ११९१२ शासन मान्यतेसाठी दि.२८.०९.२०१७ रोजी सादर केला आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि.१३.०३.२०१८ रोजी झालेल्या बैठकीतील निदेशास अनुसरुन प्रस्तुत प्रस्तावाच्या आर्थिक व्यवहार्यतेचा तपशील दि.२४.०४.२०१८ रोजीच्या पत्रानुसार सिडको महामंडळाकडून प्राप्त झाला आहे. सिडको महामंडळाने सादर केलेल्या प्रस्तावाची सविस्तर तपासणी करुन उचित निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील गटनेता निवडीच्या धोरणाबाबत

**(३३) ११०१२४ (१८-०४-२०१८). श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र महानगरपालिका कायद्यामध्ये गटनेता निवडीबाबत सुस्पष्टता नसल्याने गटनेता बदलण्याबाबत किंवा नव्याने निवडणेबाबत अनेक महानगरपालिकांमध्ये कायदेशीर पेच निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या धोरणात बदल करण्याच्या दृष्टीने शासन स्तरावर काय उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०८-२०१८) :** (१) व (२) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १९ नुसार सभागृह नेता व विरोधी पक्षनेता नियुक्तीबाबत तरतुद करणेत आलेली आहे.

महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता अधिनियम व नियमानुसार संबंधित गटाची विभागीय आयुक्त यांच्याकडे नोंद करताना गटनेत्यांची नोंद प्रचलित पध्दतीनुसार करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे महानगरपालिकेचे आयुक्त लोकशाही दिनाच्या दिवशी अनुपस्थित असल्याबाबत**

**(३४) ११०१४२ (१२-०४-२०१८). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागरिकांच्या मूलभूत सुविधांबाबतच्या अडचणी, अधिकाऱ्यांचा भ्रष्ट कारभार व त्यांच्याकडून होणारी अरेरावी यावर अखेरचा मार्ग म्हणजे महानगरपालिका आयुक्तांकडे लोकशाही दिनामध्ये दाद मागण्यात येते, मात्र पुणे महानगरपालिकेचे आयुक्त लोकशाही दिनाच्या दिवशी अनुपस्थित असल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१८) :** (१) व (२) पुणे महानगरपालिकेमध्ये लोकशाही दिनाचे आयोजन महापालिका आयुक्त स्तरावर दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी सकाळी १० वाजता महापालिका मुख्य भवनातील महापालिका आयुक्त कार्यालय सभागृहात आयोजित केले जाते.

महापालिका आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली लोकशाही दिनाचे कामकाज चालते. महापालिका आयुक्त महत्वाचे कामकाजास्तव अथवा महत्वाचे कारणास्तव रजेवर असल्यास त्यांचे अनुपस्थित अतिरिक्त महापालिका आयुक्त (जनरल/ईस्टेट/विशेष) यांचे अध्यक्षतेखाली लोकशाही दिनाचे कामकाज चालते.

जानेवारी दि. १/१/२०१८ चे लोकशाही दिनात महापालिका आयुक्त नैमित्तिक रजेवर असल्याने लोकशाही दिनास अनुपस्थित होते, त्यामुळे सदर दिनांकास अतिरिक्त महापालिका आयुक्त (विशेष) यांचे अध्यक्षतेखाली लोकशाही दिन संपन्न झाला.

काही लोकशाही दिन प्रसंगी अत्यंत तातडीच्या महत्वाचे कामकाज व बैठकीचे कारणास्तव व अत्यंत अपवादात्मक परिस्थितीत महापालिका आयुक्त अनुपस्थित राहिले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील आर्थिकदृष्या दुर्बल घटकातील महिलांना शिलाई मशील, घरघंटी व इतर योजनांच्या वस्तु खरेदी करण्यासाठी आवश्यक रक्कम त्यांच्या खात्यात वर्ग केलेली नसल्याबाबत**

**(३५) ११०२०४ (१९-०४-२०१८). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील आर्थिकदृष्या दुर्बल घटकातील महिलांना शिलाई मशीन, घरघंटी व इतर योजनांच्या वस्तु पुरविण्यासाठी मान्यता दिलेली असुन सदरच्या वस्तुंची खरेदी करण्यासाठी आवश्यक रक्कम लाभार्थ्यांच्या खात्यात वर्ग केलेली नसल्याने लाभार्थ्यांची कुचंबना होत असून सदरची रक्कम तातडीने लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करावी अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०१८ च्या पहिल्या आठवड्यात तसेच वारंवार मा.आयुक्त,ठाणे महानगरपालिका यांचेकडे केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केलेली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०७-२०१८) :** (१) लोकप्रतिनिधीकडून या विषयाबाबत लेखी तक्रारी प्राप्त झाल्या नसल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील महिला व बालविकास योजनेंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील महिलांसाठीच्या विविध योजनांसाठी एकूण १,६८२ पात्र अर्जापैकी ८७३ लाभार्थींच्या बँक खात्यात रक्कम जमा केली आहे. उर्वरीत लाभार्थ्यांना विहित प्रक्रियेचा अवलंब केल्यानंतर लाभ देण्यात येणार असल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उल्हासनगर (जि.ठाणे) महानगरपालिकेने इम्पेक्ट असेसमेंट रिपोर्ट" शासनास सादर केला नसल्याबाबत**

**(३६) १११५२० (१२-०४-२०१८). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर, कल्याण-डोंबिवली आणि मीरा-भाईंदर या महानगरपालिकेसाठी शासनाने क्लस्टर डेवलपमेंट लागू करण्यासाठी “इम्पेक्ट असीसमेंट रिपोर्ट” शासनाला त्वरित सादर करण्यासाठी सूचना दिलेल्या असून त्याप्रमाणे कल्याण-डोंबिवली व मीरा-भाईंदर ह्या

महानगरपालिकांना सदर "इम्पेक्ट असीसमेंट रिपोर्ट" शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात धोकादायक व अनधिकृत इमारतींची संख्या मोठ्या प्रमाणात असल्याने क्लस्टर डेव्हलपमेंट योजनेची सर्वात जास्त आवश्यकता उल्हासनगर महानगरपालिकेला असतानाही त्यावर अद्यापही कार्यवाही झालेली नसल्याची बाब ठाणे जिल्हा नियोजन समितीच्या दिनांक १० जानेवारी, २०१८ रोजीच्या बैठकीतून निदर्शनास आल्याने उल्हासनगरचे रहिवाशी सदर योजनेपासून वंचित राहिले आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उल्हासनगर महानगरपालिकेकडून क्लस्टर डेव्हलपमेंटसाठी आवश्यक असलेल्या "इम्पेक्ट असीसमेंट रिपोर्ट" प्राप्त करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०८-२०१८) :** (१) अशी वस्तुस्थिती नाही. कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रामधील रहिवासी यांचे प्राप्त निवेदनास अनुसरुन कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने कल्याण-डोंबिवली क्षेत्रामध्ये नागरी समूह विकास योजनाबाबतची नियमावली मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये समाविष्ट करण्याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ चा प्रस्ताव आवश्यक त्या आघात मुल्यांकन अहवालासह मान्यतेकरीता सादर केल्यास शासन त्याविषयी उचित निर्णय घेईल, असे कळविण्यात आले आहे. असा प्रस्ताव कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने शासनास अदयाप सादर केलेला नाही.

(२) व (३) शासनाने मुंबई महानगर प्रदेशातील बृहन्मुंबई महानगरपालिका, नवी मुंबई महानगरपालिका व पनवेल महानगरपालिकेतील सिडकोचे क्षेत्र वगळून उर्वरीत सर्व महानगरपालिकांसाठी एकात्मिक विकास नियंत्रण नियमावली लागू करण्याचा तत्वत: निर्णय घेवून, सदरची नियमावली आम जनतेकडून हरकती/सुचना मागविण्याकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१अेअे) (अे) मधील तरतुदीनुसार दिनांक २८/२/२०१७ रोजी प्रसिध्द केली आहे. सदर नियमावलीमध्ये नागरी पुनर्निर्माण समुह योजनेची नियमावली प्रस्तावित आहे. सदरच नियमावली मंजूर झाल्यानंतर ती उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्राकरीता सुध्दा लागू राहील.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पिंपरी -चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाने विविध पेठांमध्ये गृह योजना निर्माण केल्याबाबत

**(३७) १११६५१ (१२-०४-२०१८). श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाने कामगारांना परवडणारी घरे उपलब्ध करुन देण्यासाठी विविध पेठांमध्ये गृह योजना निर्माण केल्या, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पिंपरी प्राधिकरणामध्ये गृह योजनेमधील ६०० सदनिकांची मुळ मालकांकडून बेकायदा पध्दतीने विक्री झाल्याचे प्रकरण निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कुळ मुक्त्यापत्रांच्या आधारे बेकायदेशीर सदनिका विकून टाकल्यामुळे प्राधिकरणाला मुळ मालकांकडून १० कोटी थकबाकी असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर थकबाकी वसूल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१८) :** (१), (२), (३) व (४) पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरनाने ३२ गृहयोजनांमध्ये ११२२१ सदनिकांचे बांधकाम करुन नागरिकांना वाटप केलेले आहे.

सदनिकाधारकास सदनिकेचे अन्य व्यक्तीस हस्तांतरण करावयाचे असल्यास मूळ सदनिकाधारक व खरेदीदार यांनी हस्तांतरण फी भरुन हस्तांतरणाची कार्यवाही करणे आवश्यक आहे.

काही प्रकरणामध्ये सदनिकाधारकांनी प्राधिकरण कार्यालयात येऊन हस्तांतरणाची कार्यवाही पूर्ण न करता प्राधिकरणाच्या परवानगी शिवाय अन्य व्यक्तीस करारनामा, खरेदीखत यांच्या आधारे परस्पर विक्री केली असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे, हस्तांतरण फी वसूल झालेली नाही.

सदरची फी वसूल होण्याकरिता असे बेकायदेशीर हस्तांतरण झालेल्या प्रकरणामध्ये हस्तांतरणाची प्रक्रिया पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाकडून पूर्ण करुन घेण्यात येत आहे, असे पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाने कळवीले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शासनाने वारंवार आदेश देऊनही गोळा होणा-या दैनंदिन ८० टक्के कच-याचे ओला व सुका असे वर्गीकरण न करणा-या स्थानिक स्वराज्य संस्थांचे अनुदान थांबविण्याबाबत

**(३८) ११२२६० (१२-०४-२०१८). श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहरात वारंवार आदेश देऊनही गोळा होणा-या दैनंदिन ८० टक्के कच-याचे एप्रिल २०१८ पर्यंत ओला व सुका असे वर्गीकरण न करणा-या स्थानिक स्वराज्य संस्थांचे अनुदान थांबविण्याचा इशारा नगरविकास विभागाने दिल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने वेळोवेळी सुचना देऊनही आणि ५ ते २० कोटी पर्यंतची विविध बक्षिसे जाहीर करूनही अनेक शहरांतील स्थानिक स्वराज्य संस्था त्यांच्या क्षेत्रात गोळा होणा-या कचऱ्याचे जागेवरच वर्गीकरण करत नसल्याचेही आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुसार कच-याचे वर्गीकरण तातडीने करण्याच्या दृष्टीने कोणते प्रयत्न केले जात आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०८-२०१८) :** (१) हे खरे आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत कचरा विलगीकरणाची कार्यवाही न करणाऱ्या व स्वच्छ सर्वेक्षण-२०१८ मध्ये योग्य कामगिरी न करणाऱ्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना प्राध्यान्याने देण्यात येणारे अनुदान थांबविण्यातबाबतचा निर्णय दिनांक २९ जानेवारी, २०१८ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही.

राज्यातील एकूण २६० शहरांपैकी २४० शहरांमध्ये कचऱ्याचे विलगीकरण (Segregation) करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. राज्यातील एकूण १५६ शहरांमध्ये विलगीकरण केलेल्या ओल्या कचऱ्यावर शास्त्रोक्त पद्धतीने प्रक्रिया करून कंपोस्ट खताची निर्मिती केली जात आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भिवंडी-निजामपूर (जि.ठाणे) महानगरपालिका विकास अधिकारी यांच्याविरुध्द कारवाई करण्याबाबत

**(३९) ११२२९८ (१९-०४-२०१८). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी-निजामपूर (जि.ठाणे) महानगरपालिका विकास अधिकारी श्री.सुनिल पळसकर यांच्याविरुध्द बेशिस्त व बेजबाबदारपणामुळे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम सन १९४९ चे कलम ५६ (२) अन्वये कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, श्री. पळसकर यांच्याविरुध्द कारणे दाखवा नोटीस दिल्यानंतर महानगरपालिका प्रशासनाला श्री. पळसकर यांच्याकडून खुलासा प्राप्त झाला आहे काय,
(३) असल्यास, श्री. पळसकर यांच्यासारख्या फसवणूकीच्या गुन्ह्यात आरोपी असणाऱ्यास पाठीशी घालणाऱ्या पालिका प्रशासनाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच श्री.पळसकर यांना तातडीने विनावेतन निलंबित करण्याबाबत महानगरपालिका प्रशासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०७-२०१८) :** (१) होय.

(२) व (३) श्री.पळसकर, विकास अधिकारी यांचेवर फसवणूक केल्याचे अनुषंगाने राबोडी पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र.१४३/२०१६ भा.दं.वि.कलम ४२०, ४०६ प्रमाणे दिनांक २८.०५.२०१६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

तसेच श्री.पळसकर यांना दिनांक २३.०३.२०१८ रोजी निलंबित करण्यात आले असून त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशी सुरू केली असल्याचे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कुलाबा (मुंबई) येथील क्रॉफर्ड मार्केट येथील जे.जे.उड्डाणपुलाखाली अनधिकृतरित्या गाड्यांची पार्कींग करण्यात येत असल्याबाबत**

**(४०) ११२३८२ (१४-०४-२०१८). श्री.राज पुरोहित (कुलाबा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुलाबा (मुंबई) येथील क्रॉफर्ड मार्केट येथील जे.जे. उड्डाणपुलाखाली अनाधिकृतरित्या गाड्यांची पार्कींग करण्यात येत असल्याची धक्कादायक बाब माहे जून, २०१७ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पार्कींगसाठी नेमणूक करण्यात आलेल्या कर्मचार्यांकडून असभ्य वर्तणुक होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त पार्कींगसाठी अवास्तव पैशांची मागणी करण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या भागात मोठ्या प्रमाणात खाजगी वाहने व दैंनदिन वाहतुकीची प्रचंड कोंडी होते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१८) :** (१), (२) व (३) सदर ठिकाणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत पे ॲण्ड पार्क वाहनतळ चालविण्यात येत नाही. त्यामुळे पार्किंगसाठी नेमणूक करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांकडून असभ्य वर्तवणूक होत असणे तसेच, पार्किंगसाठी अवास्तव पैशांची मागणी करणे हे खरे नाही.

तथापि, सदर परिसरात भेट देणारे व आसपासच्या इमारतीत राहणारे नागरिक सदर ठिकाणी गाडयांची पार्किंग करीत होते ही वस्तुस्थिती आहे.

(४) सदर ठिकाणी स्थानिक रहिवाशांकडून करण्यात येत असलेल्या पार्किंगमुळे मोठया प्रमाणात खाजगी वाहने व दैनंदिन वाहतुकीची प्रचंड कोंडी होते ही वस्तुस्थिती आहे.

(५) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत वाहतुक पोलीस व स्थानिक पोलीस यांच्या सहकार्याने जे.जे. फ्लायओवरच्या पीलरमध्ये रिकाम्या जागेत माहे जून-ऑगस्ट २०१७ मध्ये सिमेंट कॉक्रिटचे डिवायडर बनविले असून, त्यामुळे जे.जे. फ्लायओव्हरच्या खाली होणारे पार्किंग बंद झाले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई येथील कुलाबा मतदार संघातील गितानगर, आंबेडकर नगर, गणेशमुर्तीनगर, महात्मा फुले नगर झोपडपट्यांमध्ये मुलभुत सुविधांचा अभाव असल्याबाबत

**(४१) ११२३९६ (१२-०४-२०१८). श्री.राज पुरोहित (कुलाबा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील कुलाबा मतदार संघातील गितानगर, आंबेडकर नगर, गणेशमुर्तीनगर, महात्मा फुले नगर, गरीब जनता नगर, मच्छीमार कॉलनी १-२-३-४-५, आझाद नगरी, ट्रान्झीस्ट व कॅम्प (संक्रमण शिबीर), धोबाघाट, शिवशक्ती नगर, सुंदर नगरी, सुदान येथील झोपडपट्यांमध्ये पिण्याच्या पाण्याची, वाहतुक रस्ते व इतर मुलभुत सोयी सुविधा नसल्याचे माहे जून, २०१७ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनूसार मूलभूत सुविधा पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१८) :** (१), (२) व (३) कुलाबा मतदार संघातील गितानगर, आंबेडकर नगर, गणेशमुर्ती नगर, महात्मा फुले नगर, गरीब जनता नगर, मच्छीमार कॉलनी १-२-३-४-५ आझाद नगरी, ट्रान्झिट कॅम्प, धोबीघाट, शिवशक्ती नगर, सुंदर नगरी, सुदाम नगरी येथील झोपडपट्ट्यांमध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे मुलभूत सोयी-सुविधा पुरविण्यात आल्या आहेत:-

**परिरक्षण**

• पायवाटा, मलनि:सारण वाहिन्या इत्यादी पुरविण्यात आल्या असून, सदर सुविधांची वेळोवेळी पाहणी करुन दरवर्षी उपलब्ध निधी वापरुन आवश्यक त्या दुरुस्त्या केल्या जातात.

• सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात एकात्मिक गलिच्छ वस्ती सुधारणांतर्गत उपलब्ध असणारा निधी वापरुन झोपडपट्टयांमध्ये पायवाटा दुरुस्ती, मलनि:सारण वाहिन्या दुरुस्ती, शौचालय दुरुस्ती, पदपथ दुरुस्ती इत्यादी कामे प्रगतीपथावर आहेत.

**जल आपुर्ती**

• सदर ठिकाणी मलबार हिल जलाशय येथून क्रॉस मैदान जलबोगद्यातून सकाळी ११ ते दुपारी १ या दरम्यान पाणी पुरवठा करण्यात येतो.

• पाणी पुरवठा करणाऱ्या ६०० मी.मी. व्यासाच्या जलवाहिनीवर भूमिगत गळती शोधण्यासाठी विशेष मोहिम राबवून, त्याअंतर्गत सापडलेल्या भूमिगत गळत्या दुरुस्त करण्यात आल्या आहेत. सदर दुरुस्तीच्या कामानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर, गणेश मुर्ती नगर व गीता नगर येथील जलप्रवाहात वाढ झाली आहे.

**मलनि:सारण वाहिन्या व शौचालय**

• सदर ठिकाणी म्हाडाची ३४ सामुदायिक शौचालये व महानगरपालिकेची ४ शौचालये आहेत,

• गरजेच्या ठिकाणी तात्पुरत्या स्वरुपाचे कंटेनर्स शौचालये बसविण्यात आली आहेत.

• सदर झोपडपट्ट्यांमध्ये स्वच्छ मुंबई प्रबोधन अभियानांतर्गत दररोज साफसफाई करुन घराघरातून कचरा गोळा केला जातो.

**रस्ते व पायवाटा**

• सन २०१६-१७ मध्ये कफ परेड येथील डॉ. होमी भाभा मार्ग ते गणेशमुर्ती नगर या मार्गिकेच्या दुरुस्तीचे काम करण्यात आले आहे.

• गणेश मुर्तीनगर ते गीतानगर येथील ४०० मी. लांब मार्गिकेची पुनर्पुष्टी करण्याचे काम प्रस्ताविण्यात आले आहे.

**वैद्यकीय सेवा**

• सदर ठिकाणी लसीकरण, लहान मुले व माता संगोपन इ. सुविधा पुरविण्यात येतात.

• पावसाळी जन्य आजार जनजागृती व औषधोपचार करण्यात येतात.

• घरोघरी जाऊन वैद्यकीय तपासणी करण्यात येते.

• वैद्यकीय शिबिर आयोजित करण्यात येतात.

**किटकनाशक सेवा**

• सदर ठिकाणी वेळोवेळी धुम्रफवारणी, अळीनाशक औषधांची फवारणी केली जाते.

• तसेच डासप्रतिबंधक उपाययोजना केल्या जातात.

---

## औरंगाबाद महानगरपालिकेत अत्यावश्यक कामासाठीचा राखीव निधी ठेकेदारांना वितरित करण्यात आल्याबाबत

**(४२) ११३४६३ (१८-०४-२०१८). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे कर्मचाऱ्यांचे पगार व पेन्शन, विद्युत देयके व अत्यावश्यक कामांसाठीचा राखीव असलेला २ कोटींचा निधी मुख्यलेखाधिकारी पदाचा अतिरिक्त पदभार असणारे एन.जी. दुर्राणी यांनी ठेकेदारांना वितरित केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हा निधी वितरित करतांना ठेकेदारांचा जेष्टताक्रम पाळला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे कर्मचाऱ्यांना पगार पेन्शन व विद्युत बिल देण्याइतकाही निधी महानगरपालिकेकडे नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधीतांवर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१८)** : (१) व (२) हे खरे नाही.

श्री.एन.जी.दुर्राणी यांनी त्यांच्याकडे मुख्य लेखाधिकारी या पदाचा अतिरिक्त कार्यभार असलेल्या काळात ठेकेदारांचा जेष्ठताक्रम न पाळता अत्यावश्यक वाटणारे धनादेश औरंगाबाद महानगरपालिकेच्या निधीमधून अदा केलेले आहेत.

(३) महानगरपालिकेतील कर्मचा-यांना वेतन व निवृत्ती वेतन, उपदान व इतर अनुषंगिक लाभ त्या त्या महिन्यात अदा करण्यात आलेले आहेत.

(४) या प्रकरणी झालेल्या अनियमिततेबाबत अतिरिक्त आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत करण्यात आलेली होती. चौकशी समितीने अहवाल सादर केला असून त्या अहवालाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येत असल्याचे औरंगाबाद महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अनुकंपातत्वावरील रिक्त पदाच्या १०% पदावरच अनुकंपाधारकांची नियुक्ती देण्याचा शासन निर्णय महानगरपालिकांना लागू नसल्याबाबत

**(४३) ११३४६७ (१४-०४-२०१८). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अनुकंपातत्वावरील रिक्त पदाच्या १०% पदावरच अनुकंपाधारकांची नियुक्ती देण्याचा शासन निर्णय महानगरपालिकांना लागू नसल्याचा आदेश नगरविकास विभागाने दिनांक २९ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निर्गमित केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेतील अनुकंपाधारकांची नियुक्ती देण्यासाठी शासनाने कोणती योजना तयार केलेली आहे,

(३) असल्यास, सदर योजनेचे स्वरुप व निकष काय आहेत व सदर निर्णयाची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०७-२०१८)** : (१), (२) व (३) • अनुकंपा तत्वावर शासन नियुक्ती देण्यासंदर्भात सामान्य प्रशासन विभागाचे दि. २१.०९.२०१७ रोजी शासन निर्णय निर्गमित केलेला असून त्यातील तरतूदी ह्या केवळ शासकीय कर्मचाऱ्यांपूरत्याच सीमीत आहेत.

• सदर तरतूदी ह्या जिल्हा परिषदा/नगरपालिका/महानगरपालिका/महामंडळे/प्राधिकरणे/व्यापारी उपक्रम व इतर तत्सम आस्थापनावरील कर्मचाऱ्यांना थेट लागू होणार नाही.

• याबाबत संबंधीत प्रशासकीय विभागाने स्वतंत्रपणे निर्णय घेणे आवश्यक राहील. त्याअनुषंगाने नगर विकास विभागामार्फत कार्यवाही विचाराधीन आहे.

• सामान्य प्रशासन विभागाने दि. १५.०२.२०१८ च्या शासन निर्णयान्वये प्रतिवर्षी रिक्त होणाऱ्या पदाच्या मर्यादेत दि.०१.०३.२०१७ पासून पुढे २ वर्षे मुदतवाढ दिलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे येथील सिंहगड रोड मधील वडगाव बुद्रुक येथील नाट्यगृह व कलामंदिराचे बांधकाम करण्याबाबत

**(४४) ११३५८३ (१२-०४-२०१८). श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील सिंहगड रोड मधील वडगाव बुद्रुक येथे सन २०१६-१७ मध्ये नाट्यगृह व कलामंदीराचे बांधकाम करण्याचे काम पुणे महानगरपालिकेने हाती घेतलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाट्यगृह व कलामंदीराच्या बांधकामाचे काम संथ गतीने सुरू असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या नाट्यगृहाच्या बांधकामाचे सर्वसाधारण स्वरूप काय आहे,

(४) असल्यास, या नाट्यगृहाला किती खर्च होणार आहे तसेच या नाट्यगृहाचे व कलामंदीराचे बांधकाम कधी पूर्ण करण्यात येणार आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१८) :** (१), (२), (३) व (४) पुणे महानगरपालिकेमार्फत सिंहगड रोड मधील वडगाव बु. येथे सन २०१६-१७ मध्ये नाट्यगृह व कलामंदीराचे बांधकाम करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे, हे खरे आहे.

सदर प्रकल्पामध्ये तळ मजला दोन बेसमेंट पार्किंगचा समावेश असून या मध्ये चारचाकी गाडया, दुचाकी वाहने, व सायकलींची पार्किंगची व्यवस्था करण्यात आली आहे.

तसेच ७५० आसन क्षमतेचे अत्याधुनिक नाट्यगृह असून त्यामध्ये भव्य स्टेज, व्ही.आय.पी. रुम, रेकोर्डिंगरुम कंट्रोल रुम ऑफिस व पहिल्या मजल्यावर १२५० चौ.मी. आकाराचे शास्त्रीय संगीत व वाद्य यांचे प्रशिक्षणासाठी संगीत महाविद्यालय तसेच दुसऱ्या मजल्यावर कलादालन व शिवसृष्टी म्युझियम, प्रसाधन गृह इत्यादी बाबी प्रस्तावित आहे.

सदर कामासाठी एकूण प्रकल्पीय खर्च अंदाजे र.रु. ३५००.०० लक्ष अपेक्षित आहे.

पूर्वगणन पत्रकानुसार आवश्यक तरतूद उपलब्ध झाल्यावर डिसेंबर, २०२२ अखेर नाट्यगृह व कलादालनाचे काम पूर्ण करण्याचे प्रयोजन आहे.

---

## भिवंडी-निजामपूर (जि.ठाणे) महानगरपालिका क्षेत्रातील प्रभागनिहाय अनधिकृत बांधकामांची यादी जाहीर केली असल्याबाबत

**(४५) ११३८४६ (१२-०४-२०१८). श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी-निजामपूर (जि.ठाणे) महानगरपालिका क्षेत्रातील प्रभागनिहाय अनधिकृत बांधकामांची यादी जाहीर केली असून सुमारे २३९ अनधिकृत आढळून आल्याचे माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय निदर्शनास आले तदनुसार सुमारे २३९ अनाधिकृत बांधकामास अभय देणाऱ्या प्रभाग अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०७-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) अनधिकृत बांधकामांवर विहित कायदेशीर प्रक्रिया पुर्ण करुन कारवाई करण्यात येत असल्याचे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

तसेच ११ प्रकरणांमध्ये पदनिर्देशित अधिकारी यांची विभागीय चौकशी सुरू असून २ प्रकरणांमध्ये संबधित पदनिर्देशित अधिकारी यांचेवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला असल्याचे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

---

## राज्यातील मुंबई महानगरपालिकेने रुग्णालय अत्याधुनिक करण्यासाठी रुग्णालय शुल्कात वाढ केल्याबाबत

**(४६) ११४३६० (१८-०४-२०१८). अॅड.वारीस पठाण (भायखळा), श्री.इम्तीयाज सय्यद (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील मुंबई महानगरपालिकेने रुग्णालय अत्याधुनिक करण्याठी महानगरपालिका रुग्णालय शुल्कात वाढ करण्याचा निर्णय माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान घेतल्याने महानगरपालिका दवाखाने महागणार आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महानगरपालिका दवाखान्यात मुंबई बाहेरील रुग्णांसाठी ३० टक्के वाढ, तर मुंबईतील नागरिकांना उपचारासाठी २० टक्के वाढीव शुल्क द्याव लागणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महानगरपालिका रुग्णालयात मुंबईकरांसोबतच मुंबई बाहेरील रुग्णही मोठ्या संख्येने उपचार घेतात, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, महानगरपालिका आरोग्य सेवेवर वर्षाला खर्च करीत असलेले शेकडो करोडो रुपयांचा विनियोग योग्य प्रकारे होत आहे किंवा नाही याकरिता कॅगमार्फत हिशोब तपासणी केली जाणार आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०६-२०१८) :** (१) व (२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये आकारण्यात येणाऱ्या विद्यमान शुल्कात २०% व मुंबईबाहेरील रुग्णांकरीता ३०% वाढीचा व ज्येष्ठ नागरिकांकरीता विनाशुल्क सेवा उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव महानगरपालिकेच्या स्थायी समितीसमोर सादर करण्यात येत आहे.
(३) हे खरे आहे.

(४) व (५) याबाबत कॅगमार्फत वेळोवेळी हिशोब तपासणी करण्यात येते व उपस्थित केलेल्या आदेशाबाबत पुर्तता करण्यात येते.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नवी मुंबई विशेष आर्थिक क्षेत्राचे रुपांतर औद्योगिक वसाहतीत करण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(४७) ११४६४५ (२१-०४-२०१८). श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई विशेष आर्थिक क्षेत्राचे रुपांतर औद्योगिक वसाहतीत करण्याच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने ८५ टक्के औद्योगिक वापर आणि १५ टक्के रहिवाशी वापर अशा निर्धारित सुत्रावरील निर्णयास तत्वता मान्यता देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भातील अटी व शर्ती तसेच आर्थिक मुल्यांकनाप्रमाणे विविध शुल्क व किंमती किती असाव्यात हे निश्चित करुन याबाबतचा अंतिम प्रस्ताव तयार करण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती तयार करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार समिती गठीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०६-२०१८) :** (१) होय.
(२) व (३) मा.मंत्रीमंडळाच्या मान्यतेनुसार शासनाने दि.१६.३.२०१८ रोजी शासन निर्णय निर्गमित केला असून सदर शासन निर्णयान्वये कंपनीने वेळेवर प्रकल्प पूर्ण न केल्यामुळे सिडकोच्या जमिन विषयक धोरणानुसार होणारा दंड व कारवाई निश्चित करणे, त्यामध्ये अतिरिक्त भाडेपट्टा रक्कम, कायदेशीर सल्ल्यानुसार नुकसान भरपाई, सिडकोचे वाढीव भागभांडवल इत्यादी बाबी तपासून त्यावर निर्णय घेणे व सदर निर्णय सिडको महामंडळास कळविणे यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती गठीत करण्यात आलेली आहे.

---

**भिवंडी-निजामपूर शहर (जि.ठाणे) महानगरपालिकेच्या चाविंद्रा हद्दीत शासकीय गुरचरण सर्व्हे नं. ११९ मधील ४३ गुंठे तर सर्व्हे नं. १२० मध्ये ३० गुंठे अशी १२३ गुंठे या जमिनींवर अतिक्रमण करुन बांधकाम केल्याबाबत**

**(४८) ११४६७४ (१४-०४-२०१८). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी-निजामपूर शहर (जि.ठाणे) महानगरपालिकेच्या चाविंद्रा हद्दीत शासकीय गुरचरण सर्व्हे नं. ११९ मधील ४३ गुंठे तर सर्व्हे नं. १२० मध्ये ३० गुंठे अशी १२३ गुंठे या जमिनींवर अतिक्रमण करुन बांधकाम केल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अवैध बांधकामाविरुध्द पालिका आयुक्त यांच्याकडे वारंवार तक्रारी करुनही त्यांनी याकडे दुर्लक्ष केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्याबस, शासकीय गुरचरण जमिनीवर अतिक्रमण करुन बांधलेल्या इमारती तात्काळ निष्कासित करण्याबाबत शासन कोणती कार्यवाही करणार वा करित आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०७-२०१८) :** (१) होय.

भिवंडी-निजामपुर शहर महानगरपालिकेने स्थळ पाहणी केली असता अनधिकृत बांधकाम केले असल्याचे निदर्शनास आले आहे.

सदर ठिकाणी १३१ झोपड्या व बैठे घरांचे बांधकाम केले असून त्यापैकी ११६ रहिवास वापर व १५ वाणिज्य आढळून आले आहे.
(२) भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका यांच्याकडे तक्रार प्राप्त झाली असल्याचे आढळून आले नाही.
(३) शासकीय जमिनीवरील अमिक्रमणांबाबत शासन परिपत्रक दिनांक ०७.०९.२०१० मध्ये नमुद केल्यानुसार अतिक्रमण प्रतिबंध करण्याची जबाबदारी ही ज्या विभागाच्या ताब्यात आहे त्या विभागाची आहे.

तद्नुषंगाने सदर प्रकरणी महसुल विभागाच्या अखत्यारीतील जमिनीवर अतिक्रमण निष्कासित करण्यासंदर्भात नियमोचित कार्यवाही करण्याची विनंती महसुल विभागास करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## औरंगाबाद येथील सिडको-हुडको येथील बॉटनिकल गार्डन परिसरातील लहान मुलांसाठी असलेली मिनी ट्रेन सुरु करण्याबाबत

**(४९) ११४८५३ (१२-०४-२०१८). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.भारत भालके (पंढरपूर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद येथील सिडको-हुडको येथील सिडको एन-८ भागातील बॉटनिकल गार्डन परिसरातील मागील तीन वर्षापूर्वी लहान मुलांसाठी मिनी ट्रेन सुरु करण्याच्या प्रस्तावास शासनाने मंजुरी दिली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मिनी ट्रेन चालू करण्यासाठी आवश्यक त्या सोई-सुविधा निर्माण करण्याकरिता त्याचवेळी (सन २०१४ मध्ये) रक्कम रुपये ३० लाखाचे अनुदान तत्कालीन मा.जिल्हा पालकमंत्री यांनी शासनामार्फत औरंगाबाद महानगरपालिकेस उपलब्ध करुन दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनुदान उपलब्धतेनंतर प्रत्यक्षात मिनी ट्रेन येऊन तसेच दोनदा या मिनीट्रेनचे ट्रायल घेऊन केवळ ट्रेन ड्रायव्हर नसल्याचे कारण देऊन ही ट्रेन मागील दोन वर्षांपासून धुळखात पडली असल्याचे दिनांक २६ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर मिनी ट्रेन तातडीने सुरु करण्याकरिता चौकशी करुन कार्यवाही करण्यात यावी अशा स्वरुपाच्या तक्रारी तेथील मा.स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे करुनही अद्याप कार्यवाही झाली नसल्याचे दिनांक १९ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यानुसार मिनी ट्रेन सुरु करण्यास जबाबदार असणांऱ्याविरुध्द कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०८-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

महानगरपालिका क्षेत्रात मूलभूत सोयी सुविधा विकास कामाकरिता अनुदान योजने अंतर्गत गठीत केलेल्या समितीकडून सदर प्रस्तावासाठी महानगरपालिकेस अनुदान मंजूर केलेले होते. परंतु प्रत्यक्षात सदर अनुदान महानगरपालिकेस प्राप्त झालेले नाही.

(३) हे खरे नाही.

संबंधित एजन्सीने महानगरपालिकेच्या ट्रेन ड्रायव्हरला प्रशिक्षण देवून मिनी ट्रेन सुरु केलेली होती. तथापि, सदर मिनी ट्रेनमध्ये तांत्रिक बिघाड झाल्यामुळे मिनी ट्रेन बंद ठेवण्यात आलेली आहे.

(४) हे खरे आहे.

(५) औरंगाबाद महानगरपालिकेच्या एन-८ सिडको येथील बॉटनिकल गार्डनमध्ये लहान मुलांसाठी सन २०१४ या आर्थिक वर्षात मिनी ट्रेन सुरु करण्यात आलेली होती. तथापि, सदर मिनी ट्रेनमध्ये तांत्रिक बिघाड झाल्यामुळे तसेच संबंधित एजन्सीला देयक प्राप्त न झाल्यामुळे सद्यस्थितीत सदर निमी ट्रेन अद्यापपर्यंत कार्यरत झालेली नाही. संबंधित एजन्सीला देयक अदा केल्यानंतर त्यांच्यामार्फत मिनीट्रेनची दुरुस्ती करुन घेऊन नागरीकांसाठी मिनी ट्रेन सुरु करण्यात येईल, असे औरंगाबाद महानगरपालिकेने कळविले आहे.

---

## पुणे महानगरपालिका शिक्षण विभागाने प्रजासत्ताक दिनाचे औचीत्य साधून महानगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांना बिस्कीट पुड्यांचे वाटप केल्याबाबत

**(५०) ११५७११ (१२-०४-२०१८). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिका शिक्षण विभागाने दिनाक २६ जानेवारी, २०१८ या दिवशी प्रजासत्ताक दिनाचे औचीत्य साधून महानगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांना बिस्कीट पुड्यांचे वाटप केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बिस्कीट पुडे जादा दराने खरेदी केल्या प्रकरणी महानगरपालिकेने उक्त फाईल सील केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी पूर्ण झाली आहे काय, दोषी अधिका-यावर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही. तथापी २६ जानेवारी, २०१७ रोजी वाटप करण्यात आलेल्या बिस्कीट दराबाबत तक्रारी प्राप्त झाल्याने सदरच्या फाईल्सच्या कपाटास सील लावण्यात आले होते.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.